## संस्थेची माहिती आणि प्रसारणाचा उद्देश .

प्रथम आपणा सर्वांचे आपला तारणारा जो **अदोनाई येशूवाह मशीहामध्ये** आपले स्वागत करीत आहोत . संस्थेच्या कार्याबाबत ठळक माहिती प्रसारीत करीत आहोत . सदर ही भा . ख्रि . सु . मं . संस्थेचे पूर्ण नाव दाखवित आहोत , भारतीय ख्रिस्ती सुवार्ता मंडळी , संस्था असे आहे . ही संस्था दिनांक ०१ एप्रिल १९८८ . रोजी पुणे येथील काही पाळक वर्गांनी एकत्र येऊन ही संस्था स्थापन केली . संस्थेच्या घटना नियमां मध्ये हा नियम ठेविलेला आहे की , सर्व सेवक व मंडळींच्या सभासदांनी मिळून सुवार्ता प्रसाराचे कार्य पूर्ण करावे . पुणे व त्याच्या जवळपासच्या परीसरामध्ये अनेक मंडळयांची बांधणी करून , मंडळयांचे जतन व सुवार्ता प्रसाराचे कार्य हे चालू ठेविले .

## The purpose of information and transmission of the organization.

**First of all you our savior , which welcome to the Adonai Yehoshua Mashiha .We are broadcasting information about this Trust organization's work .This is B. C. S. M. Trust showing the full name of the organization , This is the organization of the Bharatiya Chirsti Suvarta Mandali , trust. This organization trust Date :01April 1988. a few servants of pune , come to gather and formed this trust. It is in the rules of trust organization's constitution that all servants and church members of the community should complete the work of spreading the good news. In pune and its adjoining areas , many churches have built , spreading the church and spreading the good news.**

सुवार्ता प्रसार करण्याचे जुने साधने व प्रसाराचे प्रकार हे विज्ञान युगामध्ये चालत नसल्याने , चालू काळातील साधने व प्रसाराचे प्रकार वापरून हे सुवार्तेचे कार्य करण्याची योजना आखण्यात आली . ह्या सुवार्ता कार्यामध्ये सर्वात जास्ती भर सुवार्ता कार्याबरोबर जे सत्य वचनाच्या ज्ञानाबरोबर अत्यावश्यक असणारे , मूळ हिब्रु भाषेतील शब्दांना देण्यात आलेला आहे . सुवार्ता कार्य व सखोल मूळाला धरून असणारे पवित्र शास्त्रातील वचनाचे शिक्षण ह्या दोन विषयावर अधिक भर देण्यास आलेला आहे . चार भिंतीमध्येच ह्या सत्य वचनांचा प्रसार न ठेविता , आता तो उघडरित्या व जगजाहिर कार्य करण्याची योजना सुरू केलेली आहे .

**Because of the old methods of spreading the gospel and the types of propagation , it is planned to work on the good news by using the types of propagation of the current time ,because science is not** running

**in the era. The most important work in this Gospel work is to work together with the knowledge of truthful reading , the original Hebrew language words. There is a lot of emphasis on the teaching of the gospel work and the teachings of the Holy Scriptures that are inherent in the roots. In the four walls, without spreading the message of truth, he has now started to work openly and worldly.**

सर्वांनी एकत्र येऊन हे सर्व कार्य सुरू केलेले आहे . ह्यामध्ये मूळ हिब्रुतील वचनातील शब्दाचे शिक्षण , संदेश वचने ही व्हिडिओ संदेशांच्या माध्यमातून आणि शास्त्र वचनांचा अभ्यास हा बुकलेट ह्या माध्यमातून, मराठी व इंग्रजी भाषेमध्ये देण्यात आलेला आहे . आणि ते इंटरनेट च्या माध्यमातून सुरू करण्यात आलेले आहे . १ . वेबसाईट , २ . फेसबुक , आणि ३ . युटयुब व्दारे आहेत . हिब्रु भाषेतील मूळ बायबल सोडून इतर भाषांतरीत झालेल्या अनेक बायबलमध्ये ज्या अनेक त्रुटी आहेत , त्या त्रुटी मूळ हिब्रु भाषेतीलच शब्दांच्या व्दारे दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे . ह्या मधील सत्य हे न झाकता , हे सर्व उघडरित्या प्रसारण केलेले आहे .

**All have come together and have started all this work. This includes the teaching of the original Hebrew text , through the video message and the study of scriptures though a booklet , in Marathi and English languages. And it's been started through the Internet , 1. Website, 2.Facebook and , 3. Are by YouTube. Many of the Bible translations other than the original Hebrew languages in the Hebrew languages have been tried, have tried to remove the errors in the original Hebrew languages. It does not appear to be true in this ,it is all openly distributed.**

उदाहरणार्थ ः भाषांतरीत झालेल्या अनेक बायबलमध्ये जी देवाची म्हणजे **एलोहिम**ची जी मूळ नावे हिब्रु भाषेतील आहेत . ती कोणतेही मूळ नावे भाषांतरीत केलेल्या बायबलमध्ये जशाच्या तसे मूळ हिब्रु उच्चारा मध्ये ते शब्द घेतलेले नाहीत . हे मूळ शब्द न घेतल्याने त्या भाषांतरीत झालेल्या काळापासून ते आतापर्यंत जगातील सर्व ख्रिस्ती लोक , हे त्या **एलोहिम**च्या नावाविषयी अज्ञानामध्येच आहे . त्यास जबाबदार ज्यांनी ते बायबल भाषांतरीत केले ते आहेत . अर्थात असेच म्हणावे लागेल की , ते स्वतः ह्यावावत अज्ञानामध्ये राहिले आणि त्यांनी इतरांना देखील अज्ञानामध्ये ठेविले .

**For example : In many Bible translations , the original name of God , the Elohim , is from Hebrew .The original name, translated into**

the Bible , as originally translated as Hebrew They did not take words in Context. Because it does not take the original words , it is ignorance about the name of **Elohim**, from the time of the translation, to all the Christian in the world till now. Those responsible for it are those who have translated it from the Bible. Of course , they will have to say that they themselves remain ignorant about this and put others in ignorance.

अशा प्रकारे अनेक विषय ह्या मधून आपणास पहावयास मिळतील व अभ्यासण्याकरिता मिळतील . ह्या वेबसाईट व बुकलेट आणि युटयुब च्याव्दारे , हे मूळ व सत्य वचनाचे ज्ञान जगजाहिर प्रसारीत करण्याची सेवा ह्या माध्यमातून सुरू केलेली आहेत . हे सर्व संदेश व्हिडिओ व अभ्यास बुकलेट , पास्टर . निलेश शमुवेल गायकवाड ह्यांनी तयार केलेली आहेत .

In this way , many topics will be seen and studied for you. Through this Website and Booklet and YouTube , it has been started with the help of basic and true knowledge , world wide broadcasting service. All these messages video and study booklet , Pastor. Nilesh Shamuel Gaikwad has been created by him.

आम्हांला आशा आहे की , ह्या मधील सत्य वचनांचा अभ्यास जागतीक पातळीवरील जे अभ्यासक आहेत , ते अभ्यास करून आपल्या ज्ञानामध्ये सत्य वचनांच्या ज्ञानाची भर घालून ज्ञानवंत होतील . ज्यांना ह्यामधून ज्ञान मिळेल त्यांनी जे अज्ञानामध्ये जे लोक आहेत त्यांना , ह्या वचनाच्या ज्ञानाची वाटप करून वचनाचा प्रसार करावा . आमच्या बरोबर देखील **अदोनाई येशूवाह मशीहाच्या** वचनाच्या प्रसाराची सहभागीता करण्यास आमंत्रीत करीत आहोत .

We hope that the study of the truths in this world will be knowledge-based by studying the world-wide, studying by adding knowledge of the truthful, words our knowledge. Those who have received knowledge from this world , they can spread the knowledge of these words by distributing the scriptures to those who are in ignorance. Also with us **Adonai Yehoshua** is the **Mashiha** of reading inviting you to participate in the broadcast.

ह्या वेबसाईट व फेसबुक आणि युटयुव मध्ये फक्त पवित्र शास्त्रातील सत्य वचने ह्यावावतच विषय रहातील . दुसरे वाहेरील कोणत्याही धर्मांचे किंवा पंथाचे मुद्दे किंवा विषय हे ठेवले जाणार नाही . ही वाव

आम्हां सर्वा करिता बंधंनकारक राहील .फक्त मूळ हिब्रु शब्द आणि त्यानुसार आम्हांला ज्या काही स्वतःच्या सुधारणा करावयाच्या आहेत , त्या वचनांच्या ज्ञानाबाबतच ह्या सर्वामध्ये अभ्यासाची माहिती ही राहिल .

**This website and face book and you tube will only be the subject of truth in the Holy Scripture. The issues or topics of any religion or sect outside the other will not be kept .This will be binding on us all. It will be the study information in all of this , only on the knowledge of the original Hebrew words and the words that we want to be amended accordingly.**

शेवटी हे सर्व काही **अदोनाई येशूवाह मशीहा**मध्ये , जो **याव्हे** **आदोनाय** **एलोहिम** पिता , त्याच्या गौरवाकरिता प्रसारीत करतो , आमेन .

युटयुब उघण्याकरिता ( फक्त व्हिडिओ ) ORIGINAL BIBLE HOLY WORDS

ईमेल संपर्क Email originalbibleholywords@gmail.com

फेसबुक उघडण्याकरिता (व्हिडिओ आणि बुकलेट) ORIGINAL BIBLE HOLY WORDS

वेबसाईट उघडण्याकरिता ( व्हिडिओ आणि बुकलेट ) www.obhw-india.com

ईमेल संपर्क Email- contact @ obhw-india.com

Ultimately , all of this the **Adonai Yehoshua Mashiha** in the, who is the **Yahveh** **Adonay** **Elohim's**, is the father for his glory broadcast, Amen.

You tube open : ( only video) ORIGINAL BIBLE HOLY WORDS

Email- contact : originalbibleholywords@gmail.com

Face book open : ( video & booklet) ORIGINAL BIBLE HOLY WORDS

Website open: ( video & booklet) www.obhw-india.com

Email- contact @ obhw-india.com

ORIGINAL HOLY WORD KNOWLEDGE OPENLY PUBLICATION

मूळ पवित्र वचनाचे ज्ञान व जाहिररित्या प्रसारण

PREACHING & TEACHING AND MESSAGE VIDEO

संदेश व शिक्षण संदेश व्हिडीओ



PUBLICATION:- B.C.S.M. TRUST & BHARTIYA CHRISTI CHURCH, SIYON MANDALI, BETHEL CHURCH & OTHERS.

प्रकाशन:- भा. ख्रि. सु. म. संस्था व भारतीय ख्रिस्ती चर्च, सियोन मंडळी, बेथेल चर्च आणि इतर.

PUNE, MAHARASHTRA, INDIA.

पुणे, महाराष्ट्र, भारत.

Cont:
Pastor. N. S. Gaikwad
Mob: 9890227411

संपर्क: पास्टर. एन. एस. गायकवाड
मो. नं.: ९८९०२२७४११

Original Bible Holy Word's.in Facebook & Youtube

# संदेश व शिक्षण

## विषय : १ला

'एलोहिम' ची मूळ नावे,
आणि मानवाने त्याच्या नावामध्ये विपरीत व
अनधिकृत पणे केलेली आदला बदल.

## भाग : १ला

# प्रस्तावना

**अदोनाई येशूवाह मशीहाने** त्याच्या सर्व पवित्र जणांना आज्ञा दिली , हे प्रेषित १ ः ८ मध्ये पहावयास मिळते . " ...... आणि येरूशलेमेत , सर्व यहुदीयात , शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल ." आणि त्याच प्रमाणे स्वर्गारोहण होत असताना त्याने ही देखील शेवटची आज्ञा मार्क १६ ः १५ . मध्ये दिली " ...... की , सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा ."

ह्या आज्ञेनुसार जगामध्ये अनेक जण सुवार्ता प्रसार किंवा पवित्र शास्त्रातील वचनाचा प्रसार करीत आहेत . पण ऐकणारे जरी थोडके असले तरी ते सांगणा-यांची विधाने सत्य आहे की , असत्य आहे हे ते पडताळा करून पाहात नाही . म्हणून प्रेषित पौल हा गलतीकरांच्या मंडळीला स्पष्ट सांगतो .

" तुम्ही अन्य व विपरीत सुवार्तेकडे वळत आहात ." (गलती १ ः ६) " आणि तुम्ही घोटाळयात पाडणारे व मशीहाची सुवार्ता विपरीत करू पहाणारे असे कित्येक आहेत ." (गलती १ ः ७)

सध्याच्या काळातील ख्रिस्ती व्यक्ती हे आध्यात्मिकतेमध्ये पतन व नाश पावत आहेत , आणि याचे मुळ कारण त्यांच्या जवळ आध्यात्मिक सत्य ज्ञानाची वचने नाहीत . त्याच प्रमाणे त्यांना आध्यात्मिक पवित्र वचनाचे शिक्षण हे मुर्ख पणाचे वाटत असल्याने ते हे आध्यात्मिक शिक्षण घेत नाहीत . आणि पवित्र शास्त्राचा अभ्यास देखील स्वतःहुन ते करीत नाहीत . ज्याच्या जवळ आहे , ते देखील अपूर्ण ज्ञान असून त्यातील अनेकांजवळ सत्याच्या वचनाचे ज्ञान नाही .

आमचा हा उद्देश आहे की , हे मुळ सत्य वचनाचे ज्ञान सर्व देशामध्ये प्रसारीत करून त्यांना आध्यात्मिक ते मध्ये जागरूक करून वचनाचे मुळ हे स्पष्ट त्यांच्या समोर मांडणे . जर त्यांनी ते स्विकारले तर ते ज्ञान प्राप्त करून घेतील , आणि जरी स्विकारले नाही तर तेच अज्ञानामध्ये नाश पावतील .

हे सर्व शिक्षण व संदेश कोणत्याही ख्रिस्ती पंथाच्या व्दारे देण्यात येत नसुन , हे फक्त पवित्र शास्त्र व त्यातील मूळ सत्य वचन प्रसारक देत आहे . ही कामे करून ख्रिस्ती समाज्याला आध्यात्मिक ते मध्ये ज्ञान देवुन , ज्ञानी करण्याची सेवा करीत आहोत . कारण सध्या ह्याची गरज व आवश्यकता सर्व ख्रिस्ती समाज्याला आहे . म्हणून सर्वांकरिता आम्ही मराठी व इंग्रजी भाषेमधून संदेश व्हिडीओ व अभ्यास पुस्तीका इंटरनेट वरून **(ओरीजनल बायबल होली वर्डस )** ह्या माध्येमातून संपूर्ण जगामध्ये प्रसारीत करीत आहोत .

ह्या कामाकरिता सर्व प्रकारे सहाय्य करणा-या करिता आम्ही **आदोनाई येशूवाह मशीहा** जवळ प्रार्थना करतो की , त्याने त्यांना त्याच्या प्रीति , शांती , व आनंद देवुन त्यांच्या सर्व गरजा त्याच्या स्वर्गीय भांडारातून पुरवाव्यात . या संदेश व शिक्षण अभ्यास क्रमाबाबत किंवा संदेश व्हिडीओ बाबत ज्यांना माहिती आहे त्यानी ज्यांना माहिती नाही त्यांना माहिती दयावी . शेवटी या सर्वाव्दारे त्या **एलोहिम**चे गौरव होण्याकरिता त्याच्या हातात हे सोपवुन देतो . आमेन .

# संदेश व शिक्षण

विषय ः १ ला .                    भाग ः १ला .

विषय ः **एलोहिम**ची मूळ नावे आणि मानवाने त्याच्या नावामध्ये विपरीत व अनअधिकृतपणे केलेले अदलाबदल

ः सुरवातीस प्रार्थना करू ः

आम्ही **येशूवाह मशीहामध्ये एलोहिम** पित्याचे उपकार मानतो . त्याने त्याचे त्याच्या पवित्र वचनाची सेवा करण्याकरिता संधी दिली , हया यांत्रीक उपकरणाचा उपयोक करून , आणि सर्व जगामध्ये त्याचे जे मूळ व सत्य वचनाचा प्रसार करण्याचे मार्ग मोकळे केले, त्या बददल त्याचे आभार मानतो. या संदेश आणि शिक्षणाच्या माध्यमातून तुझ्या वचनाचे सत्य सर्वापर्यंत प्रसारीत होऊ दे . अनेकांना हया वचनाच्या ज्ञानाने तू परीपूर्ण कर . आणि हे सत्य स्विकारण्यास त्यांना समंजसपणाचा आत्मा दे . त्याचप्रमाणे ज्यांनी हे सर्व पूर्ण होण्यासाठी परिश्रम घेतले व आर्थिक साहाय्य केले , त्यांना तू स्वर्गीय आशीर्वादाने आशीर्वादीत कर . आता हे सर्व तुझ्या गौरवाकरीता होऊ दे . ही विनंती आपला मध्यस्थ **आदोनाई येशूवाह मशीहाच्या** नावात करतो आमेन .

आपण आपला संदेश व शिक्षणाकडे वळू या , आणि त्यातील जो विषय आहे त्याच्या अभ्यास करू .

विषय ः **एलोहिम**ची मूळ नावे आणि मानवाने त्याच्या नावामध्ये विपरीत व अनअधिकृतपणे केलेले अदलाबदल .

मूळ नावावरून त्या व्यक्तीची ओळख होते . हिब्रु भाषेमध्ये देव या शब्दाला **एलोहिम** हा शब्द वापरलेला आहे . आणि **एलोहिम**चे मुळ नावे काय आहेत ? हे पवित्र शास्त्रात सुरूवातीस पहावयास मिळते .

त्या काळामध्ये कोणत्याही प्रकारचे धर्मग्रंथ नव्हते, किंवा शिक्षण देण्या-या शाळा नव्हत्या . तरी त्या काळातील लोकांना **एलोहिम**च्या नावाची माहिती होती . आणि ते लोक त्याचे नाव घेऊन त्याची प्रार्थना करीत होते . सध्याच्या विज्ञान युगामध्ये धार्मिक मूळ बायबल असताना देखील , त्या **एलोहिम** चे मूळ नाव त्याच्या लोकांना माहिती नाही , ही मोठी दुःखाची बाब आहे . जगामध्ये भाषांतर झालेल्या कोणत्या ही भाषेतील बायबल मध्ये **एलोहिम** ची मूळ नावे घेतलेली नाही . परंतु जगामधील इतर देवांची नावे त्या **एलोहिमच्या** मूळ नावा ऐवजी घेतलेली आहेत . ख्रिस्ता पूर्वीच्या काळातील लोक **एलोहिमचे** कोणते नाव घेऊन त्याची प्रार्थना करीत होते ते पाहु .

* पहिला संदर्भ ...... प्रारंभ ४ ः २६ . “ आणि शेथ यालाही मुलगा झाला , त्याने त्याचे नाव अनोश ठेविले , तेंव्हा माणसे **याव्हे** आदोनाय चे नाव घेऊन प्रार्थना करू लागले . ”

येथे परमेश्वर , किंवा देव , किंवा ईश्वर , किंवा भगवान , किंवा गॉड , किंवा लॉड , किंवा खुदा , किंवा इतर कोणतीही जगातील देवांची नावे वापरलेली नाहीत . हे कोणतेही शब्द मूळ हिब्रु मधील तोरा म्हणजे नियम शास्त्रातील नाही . मूळ हिब्रु बायबल तोरा हे , स्पष्ट जे विषेशनाम व जे परमपवित्र नाव **याव्हे** **आदोनाय** हा शब्द दाखवित आहे .

* दुसरा संदर्भ ........... प्रारंभ १२ ঃ ८ आणि २१ ঃ ३३ .

( पहिला ) " अब्राहामाने तेथे **याव्हे** **आदोनाय** साठी वेदी बांधली , आणि **याव्हे** **आदोनाय** चे नाव घेऊन प्रार्थना केली . " (प्रारंभ १२ ঃ ८)

( दुसरा ) " आणि तेथे सनातन (ओल-वाम)' **ऐलोह** ' **याव्हे** **आदोनाय** याचे नाव घेऊन प्रार्थना केली . " (प्रारंभ २१ ঃ ३३)

जर आपण मूळ हिब्रु मधील वचने पहात गेलो , तर जी अनेक **एलोहिम**ची मूळ नावे आहेत ते पहावयास मिळते . परंतु भाषांतर केलेल्या वचनामध्ये त्याची जी वेगवेगळी नावे टाकलेली आहेत , ती नावे पहावयास मिळतात .

* तिसरा संदर्भ ......... प्रारंभ २६ ঃ २५ . " मग इसहाकाने तेथे वेदी बांधली , आणि **याव्हे** **आदोनाय** चे नाव घेऊन प्रार्थना केली . "

* चौथा संदर्भ ......... प्रारंभ २८ ঃ २१ . " याकोब म्हणाला , मी आपल्या बापाच्या घरी सुखरूप परत येईल तर **याव्हे** **आदोनाय** माझा **एलोहिम** होईल . " याकोबाला **याव्हे** **आदोनाय** च्या नावाची माहिती होती , परंतु तोच पुढे त्याला त्याचे नाव विचारीत आहे . (प्रारंभ ३२ ঃ २९)

याकोब विचारतो , तुझे नाव काय आहे ? आणि **एलोहिम** त्याला उत्तर देतो , तु माझे नाव का विचारतोस ?

पुढे मोशेच्या बाबत पहावयास मिळते , त्याचे बालपण मिसरी राजाच्या घरी झालेले होते . आणि त्यास **एलोहिम** च्या बाबत व त्याच्या नावाबाबत माहिती नव्हती . परंतु इस्त्राएल लोकांस **एलोहिम** च्या बाबत माहिती होती .

* पाचवा संदर्भ .........फारो राजाच्या गुलामगिरीतून इस्त्राएल लोकास सोडविण्याकरिता **एलोहिम**ने मोशेची निवड केली , आणि मोशेला दर्शन दिले , तेंव्हा त्याने एक प्रश्न उपस्थित केला . हे आपणास निर्गम ३ ঃ१३ ते १५ वचनामध्ये पहावयास मिळते .

वचन १३ मध्ये " तु मला इस्त्राएलकडे पाठविले आहे आणि मी इस्त्राएल वंशजाकडे जाऊन त्यास सांगितले असता , त्याचे नाव काय ? असे विचारतील तेंव्हा मी त्यांना काय सांगू ?"

" ज्याने तुला आमच्याकडे पाठविले आहे त्याचे नाव काय ? असे विचारल्यास मी त्यास काय सांगू ? "

वचन १५ मध्ये " **एलोहिमने** मोशेला सांगितले , तू इस्त्राएल लोकांस सांग तुमच्या पूर्वजांचा **एलोहिम**, अब्राहामचा, इसहाकाचा, याकोबाचा **एलोहिम याव्हे** **आदोनाय** याने मला तुम्हांकडे पाठविले आहे ."

" **याव्हे** **आदोनाय** हे माझे युगांनुयुगाचे नाव आहे , व त्याच नावाने पिढयांन पिढया माझे स्मरण होईल ."

ह्या वचनामध्ये त्याने स्वतःच्या मूळ नावाची तपशिल सविस्तर दिलेली आहे . आणि हे माझे नाव तुमच्या सर्व पिढयांना स्मरण राहील . ह्या संदेशाचे व अभ्यास शिक्षणाचे हेच दोन मुद्दे सर्वात महत्वाचे आहेत .

पहिला = जेंव्हा त्याने स्वतः त्याचे मूळ नाव **याव्हे** **आदोनाय** **एलोहिम** आहे असे लेखी सांगितले , तर ह्या त्याच्या मूळ नावाच्या जागेवर जगातील इतर देवांची नावे त्यास का देण्यात आली ? हा भाग आध्यात्मिकते मध्ये फार मोठा प्रश्न उपस्थित करतो .

दुसरा = जेंव्हा त्याने लेखी दिलेले आहे की , हे तुमच्या पिढयांन पिढया स्मरणात राहाण्यासाठी लेखी दिलेले आहे , तर ... जगातील सर्व भाषांतरण करणा-यांनी ह्या मूळ बायबल मधून भाषांतरण करीत असता ह्या दोन मुद्दाकडे दुर्लक्ष का केले ?

* सहावा संदर्भ ...... निर्गम ३ ः १३ ते १५व्या वचना प्रमाणे च होशेय १२ ः ५ मध्ये सांगितलेले आहे हे पहावयास मिळते . " **याव्हे** **आदोनाय** सेनाधीश **एलोहिम याव्हे** **आदोनाय** हे नाव स्मारक आहे ." होशेय संदेष्टा हा देखील त्याच्या नावाचे स्मरण करून त्याचे जे मूळ नाव आहे त्याबाबत तो दाखवित आहे . " **याव्हे** **आदोनाय** सेनाधीश **एलोहिम याव्हे** **आदोनाय** हे नाव स्मारक आहे ."

* सातवा संदर्भ ...... निर्गम ६ ः २,३ . " **एलोहिम** मोशेशी बोलला , तो म्हणाला , मी **याव्हे** **आदोनाय** आहे . मी अब्राहाम , इसहाक , व याकोब यास सर्वसमर्थ ( मुळात हिब्रु शब्द **एल -शाद्दाय** ) **एलोहिम** म्हणून प्रगट झालो . तथापि **याव्हे** **आदोनाय** या माझ्या नावाने मी त्यास ओळख दिली नाही ."

ह्या वचनामध्ये त्याचे अजून एक विषेश नाव पहावयास मिळते . मराठीमध्ये त्याचे भाषांतरण सर्व समर्थ या शब्दाने करण्यात आलेले आहे . ' **एल -शाद्दाय** ' **एलोहिम** चे हे एक मूळ हिब्रु मध्ये त्याचे नाव पहावयास मिळते . त्याच प्रमाणे तो पुढे मोशेला सांगतो की , मी **याव्हे** **आदोनाय** ह्या माझ्या नावाने मी त्यास ओळख दिली नाही .

ह्या वेळेस **याव्हे** **आदोनाय** ह्या नावाबाबत हिब्रु धार्मिक नियमानुसार पहाणे जरूरीचे आहे .

इस्त्राएलातील धार्मिक अधिकारी ह्यांचा अलिखीत नियम आहे की , '**याव्हे** ' हा शब्द परमपवित्र शब्द असल्याने कोणताही मनुष्य हा शब्द उच्चारण्यास अपात्र आहे . ते हा शब्द न उच्चारता त्याच्या ऐवजी '**आदोनाय**' शब्द उच्चारीत होते . हिब्रु धार्मिक जुन्या करारामध्ये हा शब्द उच्चारला जात होता . पण '**याव्हे**' व '**आदोनाय**' ही दोन्ही नावे सोबत तशीच त्यांच्या मूळ जुन्या करारात ठेवलेली आहेत .

त्याच प्रमाणे इस्त्राएल हिब्रु धार्मिक व्याकरण शिक्षणानुसार **'याव्हे'** हा शब्द फक्त गद्यामध्ये वापरला जातो. ते पद्यामध्ये **' एलोहिम'** हा शब्द वापरीत होते. पद्यामध्ये **'याव्हे'** हा शब्द ते वापरीत नव्हते. म्हणून दहा आज्ञामध्ये **'याव्हे'** हे नाव व्यर्थ घेऊ नको ही आज्ञा पहावयास मिळते. ( निर्गम २० ःं७)

पवित्र शास्त्रामध्ये जेथे जेथे **'याव्हे'** हा शब्द वापरलेला आहे तेथे तेथे तो न्याय व शासन करता हे पहावयास मिळतो. त्याच प्रमाणे तो ईर्ष्यावान असा दाखविलेला आहे , आणि तो अस्तित्वात आणणारा व नाश करणारा हे पहावयास मिळते.

जगातील इतर देवांनी हे सर्व काही अस्तित्वात आणले हे मूळ हिब्रु बायबल कोठेही दाखवित नाहीत. जी नावे सध्याच्या सर्व भाषांतरीत बायबलमध्ये वापरलेली आहेत , ती हिब्रु भाषेमध्ये कोठेही दिलेली नाहीत. आणि ह्या नावांना मूळ बायबल किंवा **याव्हे आदोनाय** सहमती देत नाही. सहामती न देणारी वचने ही बायबल मधून पाहु.

जे दावीद राजाने स्तोत्रामध्ये लिहीलेले आहेत. स्तोत्र १६ ः ४. " मी त्यांच्या देवांची नावे उच्चारणार नाही."

इस्त्राएल लोकास **याव्हे आदोनाय एलोहिम** सांगतो. निर्गम २० ः ३. " माझ्या शिवाय तुला अन्य देव नसावेत."

आमच्या **एलोहिम**ला त्याचे विषेश व परमपवित्र नावे असी स्वतःची नावे आहेत. ज्या मानवाला त्याने निर्माण केले आहे , त्याच्याकडून स्वतःच्या नावाचे नामकरण विधी तो करून घेईल काय ? मूळ हिब्रु बायबल मध्ये असलेली जी त्याची विषेशनावे आहेत , ती पुन्हा आपण पाहु. **एलोहिम , ऐलओ , एलोई , एली , याव्हे , याह , अदोनाई, अदोन , आदोनाय , एल -शाद्दाय , व इतर**. ही त्याची मूळ नावे , आपापल्या मूळ भाषेतील भाषांतरामध्ये , हे उच्चार जसाच्या तसाच घेता आला असता. पण भाषांतरण करणा-यांनी ते मूळ शब्द घेतलेले नाही. प्रत्येकांनी ही जी **एलोहिम** ची मूळ नावे आहेत , ती स्मरणार्थ ठेवावी व आपले पवित्र शास्त्र वाचत असताना , त्या मूळ नावाचा च उच्चार करावा. हे मूळाला व सत्यालाच धरून आहे.

सध्या आपण जे एकविसाव्या शतकातील लोक जे बायबल वापरतो , ते वास्तविक हे बायबल सतराव्या व आठराव्या शतकातील जे लोक होते , त्यांच्या करिता हे बायबल होते. परंतु आजच्या एकविसाव्या शतकातील प्रगत ज्ञानानुसार , आमच्या जवळ जे मूळ हिब्रुतील बायबल हवे आहे. जरी मूळ संपूर्ण नसले तरी चालेल , पण जे विषेश नावे आहेत , ते हिब्रु भाषेमध्ये च पाहिजेत.

पिढयांन पिढया सर्व मानवाने या एलोहिम ची मूळ नावे आपल्या स्मरणार्थ ठेवण्याबावत जी इतर वचने आहेत , ती आपण पाहु.

स्तोत्र १३५ ः १३ . “ परंतु हे **यान्हे** **आदोनाय** तुझे नाव सदासर्वकाळ राहिल ; हे **यान्हे** **आदोनाय** तुझे स्मरण पिढयांन पिढया राहिल .”

स्तोत्र १0२ ः १२ . “ हे **यान्हे** **आदोनाय** तू सर्वकाळ राजासनारूढ आहेस . तुझ्या नावाचे स्मरण पिढयांन पिढया कायम राहील .”

निर्गम ३ ः १५ . “ आणखी **एलोहिमने** मोशेला सांगितले , तु इस्त्राएल लोकास सांग , तुमच्या पूर्वजांचा **एलोहिम** , अब्राहामचा **एलोहिम** , इसहाकाचा **एलोहिम** , याकोबाचा **एलोहिम** **यान्हे** **आदोनाय** याने मला तुंम्हाकडे पाठविले आहे . हेच माझे युगानुयुगाचे नाव आहे , व याच नावाने पिढयांन पिढया माझे स्मरण होईल .”

होशेय १२ ः ५ . “ **यान्हे** **आदोनाय** सेनाधीश **एलोहिम** **यान्हे** **आदोनाय** हे नाव स्मरक आहे .”

ह्या बाबतीत कोणत्याही ज्ञानवंत सेवकांनी , किंवा इतर लोकांनी , ह्या नावाबाबत विचार केलेला आहे काय ? आणि इतर भाषांतरीत झालेले बायबल पाहिल्यास ,त्याचे उत्तर नाही असे मिळते . ह्या बाबतीत अज्ञानामध्ये स्वतः राहिले , आणि इतर सर्वांना अज्ञानामध्ये ठेविले .

त्याच प्रमाणे अनेक ख्रिस्ती ईश्वर विज्ञान कॉलेज , असून त्यांनी देखील ह्या बावती तील मूळ ज्ञान प्रसारीत केले नाही .

पुढील तक्त्यामध्ये इतर काही भाषांतरीत बायबल मधील भाषांतर केलेले शब्द व मूळ हिब्रु भाषेतील शब्द दाखविलेले आहेत . वास्तविक त्यांना मूळ शब्द त्या जागी तसेच भाषांतरीत शब्द ठेवता आले असते . पण त्यांनी हिब्रु शब्द आपल्या भाषेतील बायबलमध्ये शब्द ठेविले नाही .

| मूळ हिब्रु शब्द . | मराठी शब्द . | हिंदी शब्द . | इंग्रजी शब्द . | ग्रीक शब्द . |
|---|---|---|---|---|
| १) יהוה....אדני | परमेश्वर | परमेश्वर | लॉड | कुरीओस |
| * मुळ हिब्रु उच्चार | यान्हे आदोनाय | यान्हे आदोनाय | Yahveh Adonay | यान्हे ह्या शब्दाचा उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |
| २) אלהים | देव , भगवान ईश्वर. | देव , खुदा ईश्वर. | गॉड | थेओस |
| * मूळ हिब्रु उच्चार . . | एलोहिम | एलोहिम | Elohim | एलोहिम शब्दाचा उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |

| मूळ हिब्रु शब्द . | मराठी शब्द . | हिंदी शब्द . | इंग्रजी शब्द . | ग्रीक शब्द . |
|---|---|---|---|---|
| ३ ) אדני | प्रभु | प्रभु | लॉड | कुरीओस . |
| * मूळ हिब्रु उच्चार . . | अदोनाई | अदोनाई | **Adonai** | अदोनाई शब्दाचा उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |
| ४ ) יה | परमेश्वर | परमेश्वर | लॉड | कुरीओस |
| * मूळ हिब्रु उच्चार . . | याह | याह | **Yah** | याह शब्दाचा उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |
| ५) אדון | देव | देव . | गॉड | थेओस . |
| * मूळ हिब्रु उच्चार ... | अदोन | अदोन | **Adon** | अदोन शब्दाचा उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |
| ६ ) אלי | देव | देव . | गॉड | थेओस . |
| * मूळ हिब्रु उच्चार . | ऐलओ | ऐलओ | **Eloh** | एलोई शब्दाचा . उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |
| ७ ) עלי | देव | देव . | गॉड | थेओस . |
| * मूळ हिब्रु उच्चार | एली एलोई | एली एलोई | **Eloi** | एली शब्दाचा उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |
| ८) משיח | ख्रिस्त | ख्रिस्त | **Christ** | **Christos** |
| * मूळ हिब्रु उच्चार . | मशीहा | मशीहा | **Mashiah** | मशीहा शब्दाचा उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |

| मूळ हिब्रु शब्द . | मराठी शब्द . | हिंदी शब्द . | इंग्रजी शब्द . | ग्रीक शब्द . |
|---|---|---|---|---|
| יהושע | येशू | यीशू | Jesus | Iesous |

९ )

| * मूळ हिब्रु उच्चार . | येशूवाह | येशूवाह | Yehoshua | येशूवाह शब्दाचा उच्चार ग्रीक भाषेत घेणे . |
|---|---|---|---|---|

सदर तक्त्यामध्ये पाहिल्यास प्रत्येक भाषेतील शब्द भाषांतरण करणा-यांनी एलोहिमच्या मूळ हिब्रु शब्द न ठेविल्यामुळे, आज जगातील अनेक ख्रिस्ती लोक **एलोहिम** च्या मूळ नावा बाबत अज्ञान अवस्थेत आहेत . परंतु जो **एलोहिम** चा विरोधक व प्रतिस्पर्धी आहे , त्याचे हिब्रु मधील नाव , हे अनेक भाषांतरीत बायबलमध्ये तसेच ठेवलेले आहे , हे पहावयास मिळते .

| | मूळ हिब्रु शब्द . | मराठी शब्द . | हिंदी शब्द . | इंग्रजी शब्द . | ग्रीक शब्द . |
|---|---|---|---|---|---|
| १० ) | שטן | सैतान | शैतान | Satan | Satanas |

जुन्या करारातील शब्द ईयोब १ ः ६ वचन व प्रगटी १२ ः ९ मध्ये समान शब्द आलेला आहे .

जगामधील विज्ञानाची फार मोठी झालेली आहे , परंतु आध्यात्मिकते मध्ये आजच्या आत्याधुनीक विज्ञानात चालणा-या त्याच्या लोकांनी , त्याचे जे मूळात असणा-या हिब्रु वचनाच्या ज्ञानाची प्रगती केलेली नाही, हिच मोठी दुःखाची व खेदाची बाब आहे . जगामध्ये व्यक्तीची नावावरून त्या त्या व्यक्तीची ओळख होते . आणि ओळख झाल्यावर एलोहिम बरोबर त्याचे संबंध जाडिले जातात , आणि नंतर देवान-घेवान करणे , सुख-दुःखाची सहभागीता करणे , म्हणून नाव व व्यक्तीशा ओळख आणि संबंध **एलोहिम**शी जोडणे हे फार महत्वाचे आहेत .

आपण आता पर्यंत नावा बाबत पाहिले आहे , आता त्याच्या ओळखी बाबत पहाणे हे देखील जरूरीचे आहे . जुन्या करारामध्ये सेवकांना ओळख पटविण्याकरिता तो **एलोहिम** स्वतः दर्शन देत होता . आणि दर्शनाव्दारे जे त्याचे स्वतःचे नाव आहे , त्या नावाची जाणीव करून देत होता .

उदा . प्रारंभ ३५ ः ९ व ११ " याकोब पदन आरामाहून परत आल्यावर **एलोहिम** ने त्याला पुन्हा दर्शन देऊन आशिर्वाद दिला . "

" **एलोहिम** त्याला आणखी म्हणाला , मी सर्वसमर्थ (**शाद्दाय** हे मुळ हिब्रु नाव ) **एल** ( हे **एलोहिमचे** एक नाव ) आहे . " ( **एल- शाद्दाय** )

नविन करारामधील देखील उदा. पाहु.

प्रेषित ९ ः ३ व ५ " असे झाले की , शौल दिमिष्का जवळ येऊन पोहचला. त्यवेळी अकस्मात त्याच्या सभोवती आकाशातून प्रकाश चमकला , तेव्हां शौल म्हणाला , **अदोनाई** तू कोण आहेस ? त्याने म्हंटले ज्या **येशूवाह** चा तू छळ करतो , तोच मी आहे."

येशू , यीशू , जिझस , आयसेस , हे शब्द **येशूवाह** ने उच्चारलेले नाही. वास्तविक हे सर्व शब्द मूळ हिब्रु नसून ग्रीक भाषेतील भाषांतर केलेले शब्द आहेत. परंतु ह्या संदर्भामध्ये **येशूवाह** हा हिब्रु भाषेत शौला बरोबर बोलत आहे , **हे स्पष्ट प्रेषित २६ ः १४ . १५ मध्ये दिलेले आहे.**

फक्त नावाची ओळख असून काही फायदा नाही , व्यक्तीची पूर्ण ओळख ही त्याच्याबरोबर संबंध जोडल्या नंतरच होत असते.

जगातील ख्रिस्ती लोकांचे जर परिक्षण केले , तर ह्याबाबत पुढील माहिती मिळते.

बालपणापासून जे चुकीच्या वचनाचे शिक्षण देण्यात आले , ते सुधारूण घेण्याकरिता तयार नाही.

त्याच्या स्मरणार्थ अपूर्ण वचनाचे ज्ञान ठेवण्यात आलेले आहे. स्वतःहून सत्य ज्ञान शोधणे , त्याचा अभ्यास करणे , व आपल्या बुध्दिमत्तेमध्ये आध्यात्मिक सत्य ज्ञानाची भर घालणे , हा भाग त्यांच्या जवळ नाही. आध्यात्मिकते मध्ये नाश झाला तरी चालेल , पण सत्य ज्ञान स्विकारणार नाही.

**येशूवाह मशीहाने** मत्तय ६ ः ३३ मध्ये जे सांगितले आहे. त्या सत्य वचनाच्या विरूद्ध ते करीत आहे. " तर तुम्ही पहिल्याने त्याचे राज्य व त्याची नीतिमत्वा मिळविण्यास झटा , म्हणजे त्याच्या बरोबर ह्याहि सर्व गोष्टी तुम्हांस मिळतील." प्रत्येक ख्रिस्ती लोकांनी सर्वात प्रथमस्थान हे आध्यात्मिक गोष्टीला दिले पााहिजे , जगातील गोष्टी ह्या प्रथमस्थानाच्या नाही.

म्हणून शलमोन राजा सांगतो. " **आत्मा अज्ञानी असणे हे चांगले नाही.**" ( नीतिसूत्रे १९ ः २ )

ह्या पहिल्या भागामध्ये **एलोहिम** चे मूळ नावे ही पाहिली आहेत. त्याच प्रमाणे भाषांतरण करणा-या व्यक्तीना ती हिब्रु मूळ नावे , तसेच ठेवण्यास कोणतीही हरकत नव्हती हे पहावयास मिळते.

भाषांतरीत बायबल आल्या पासून त्या काळातील लोक व सध्याच्या काळातील लोक , हे **एलोहिम** च्या मूळ सर्व नावांच्या व माहितीच्या बाबत अज्ञानी राहिलेले आहेत. म्हणुन आजच्या विज्ञान युगातील लोकांनी मूळ हिब्रु बायबल मधून, आपल्या भाषांतरीत बायबल मध्ये , सुधारणा करून घ्यावी. तसेच हे सर्वीकडे झाल्यास, तेव्हां त्या **एलोहिम** च्या नावाचे स्मरण ह्या पिढीमध्ये झाले आहे , असे आनंदाने म्हणता येईल , आणि त्याचे गौरव होईल. **अदोनाई** ची स्तुती होवो , **आमेन !** **आमेन !!** **आमेन ! ! !**

क्रमशा ......

************************




# संदेश व शिक्षण

विषय ः- १ ला . एलोहिमची मूळ नावाबाबत , व एलोहिम बरोबर व्यक्तीशः ओळखीबाबत , आणि एलोहिम बरोबर नातेसंबंध जोडण्याबाबत .

भाग ः- २ रा . एलोहिमची व्यक्तीशः ओळख .

भाग ः दुसरा . विषय ः **एलोहिमची** व्यक्तीशः ओळख .

पहिल्या भागामध्ये आपण पाहिले आहे की , **एलोहिम**ची मूळ हिब्रु भाषेमध्ये जी अनेक नावे आहेत, ती आपण पाहिली आहेत . ह्या मूळ नावाचा हिब्रु भाषेतील उच्चार प्रत्येक भाषांतरणामध्ये मूळ शब्द घेता येत होता . परंतु ते मूळ शब्द उच्चार जशाच्या तसे त्यांनी भाषांतरणात शब्द घेतले नाही .

त्यामूळे भाषांतरीत केलेले ते पवित्र शास्त्र कोणत्या धर्माचे व कोणत्या देवाचे आहेत , हे कोणालाही ठाम पणे सांगता येणार नाही . जर कोणीही म्हणत असेल की , ते **एलोहिमचे** आहे , तर त्याची नावे त्याच्या पवित्र शास्त्रामध्ये का पहावयास मिळत नाहीत ? पवित्र शास्त्र हे घटना , व नियम , आणि आज्ञा , व विधी ह्या बाबतच्या कायद्याचे पुस्तक आहे . आणि कायद्याने लेखामध्ये मूळ अधिकृत व्यक्तीच्या नावाची नोंद होणे कायद्यानेच अत्यावश्यक आहे .

ह्या विषयामध्ये तीन भाग पाडलेले आहेत , १ ) **एलोहिम**ची मूळ नावे आणि मानवाने त्याच्या नावामध्ये विपरीत व अनधिकृतपणे केलेली आदलाबदल . २ ) **एलोहिम**ची व्यक्तीशः ओळख , ३ ) **एलोहिम**च्या ओळखीबरोबर व्यक्तीशः त्याच्याबरोबर नाते संबंध जोडणे .

ह्या दुस-या भागामध्ये **एलोहिम**ची व्यक्तीशः ओळख , ह्या बाबत संदेश , व अभ्यास करणार आहोत . **एलोहिम**ची ओळख ही सर्वांना होत नाही . आध्यात्मिकते मध्ये फक्त , नावाची ओळख असून काही ही फायदा नाही . म्हणून व्यक्तीशः ओळख असणे हे फार महत्वाचे आहे .

सुरूवातीच्या काळातील मानवांना , **एलोहिम**च्या बाबातची ओळख व माहिती होती . ते मूळ हिब्रु पवित्र शास्त्रातील वचनातून पहावयास मिळते . परंतु सध्याच्या काळातील मानवांना **एलोहिम**ची ओळख नाही , हे वचन स्पष्ट दाखविते . हे **येशूवाह मशीहा** सांगत आहे ,

**एलोहिम** बापाला जगाने ओळखीले नाही . योहान १७ ः २५ . “ त्याने जग निर्माण केले , तरी जगाने त्यास ओळखीले नाही . ”

मोशेला फारो राजा सांगतो , “ मी त्या **याव्हे** आदोनाय ला ओळखीत नाही . ” निर्गम ५ ः २ .

मुख्य याजकाच्या दासीला पेत्र सांगतो, “ मी **येशूवाह** ला ओळखीत नाही . ” मत्तय २६ ः ७३, ७४ .

प्रेषित योहान सांगतो , “ ह्यामूळे जग आपल्याला ओळखीत नाही , कारण जगाने **एलोहिम**ला ओळखीले नाही . ” १ ले योहान ३ ः १ . ख्रिस्ती म्हणवून घेणा-यांनी देखील , **एलोहिम**ला आणि **येशूवाह मशीहाला** अजून पर्यंत ओळखीले नाही . अर्थात ः जगातील मानवाने व त्याचे स्वतःचे म्हणवून घेणारे जे आहेत , त्यांनी त्याला ओळखीले नाही . **येशूवाह** हा तारण प्राप्ती साठी सांगतो , “...... तू जो एकच खरा **एलोहिम** त्याला व ज्याला तू पाठविले त्या **येशूवाह मशीहाला** त्यांनी ओळखावे . ” योहान १७ ः ३ .

पित्याची म्हणजे **एलोहिम**ची व पुत्राची म्हणजे **येशूवाह** ह्या दोघांची ओळख अत्यावश्यक आहे. ओळख होण्याकरिता काय काय करावे लागते, हे पवित्र शास्त्रामधून च पहाणे जरूरीचे आहे.

१ ) " जो **एलोहिम**च्या आज्ञा पाळतो, तो **एलोहिम**ला ओळखतो." १ ले योहान २ ः ४.

२ ) " जो **एलोहिम** वर प्रीति करतो, तो **एलोहिम**ला ओळखतो." १ ले योहान ४ ः ८.

३ ) " जो **एलोहिम**ला आळखतो तो आपले ऐकतो, जो **एलोहिम**चा नाही तो आपले ऐकत नाही." १ ले योहान ४ ः ६.

४ ) जो पवित्र आत्म्याने परीपूर्ण होतो, त्याला **एलोहिम** ओळखतो. आणि जो पवित्र आत्म्याने परीपूर्ण होत नाही, त्याला **एलोहिम** ओळखत नाही. मत्तय २५: १२.

५ ) जो पाचारणानुसार त्याचे सेवा कार्य करीत नाही, तर स्वतःच्या इच्छेने सेवा कार्य करितो. त्याला येशूवाह मशीहाची ओळख झालेली नाही. मत्तय ७: २२, २३. परंतु जे त्याच्या इच्छेनुसार व पाचारणानुसार सेवा कार्य करितात, त्यांनाच **येशूवाह मशीहा** हा ओळखतो.

६ ) " **याव्हे** **आदोनाय** हा दयाळू आहे, व पृथ्वीवर धर्म व न्यायाने चालणारा आहे, ह्याची जाणीव व ओळख ज्याला आहे. त्याच्या बाबत **याव्हे** **आदोनाय** संतोष आहे. असा **याव्हे** **आदोनाय** म्हणतो. " यिर्मया ९ ः २४.

ज्याला **एलोहिम**ची ओळख आहे, आणि **एलोहिम**ला त्याची ओळख आहे, त्यांच्या करिताच **एलोहिम** सांगतो.

७ ) " माझ्यावर त्याचे प्रेम आहे, म्हणून मी त्याला मुक्त करीन, त्याला माझ्या नावाची जाणीव ( ओळख ) आहे, म्हणून मी त्याला उच्चस्थळी सुरशित ठेवील." स्तोत्र ९१ ः १४.

८ ) " **याव्हे** **आदोनाय** हाच **एलोहिम** आहे, असे तुम्ही जाणा ( ओळखा )." स्तोत्र १00 ः ३.

**एलोहिम** च्या इच्छे प्रमाणे जो चालतो, जो बोलतो, व जो करिता, त्याचीच ओळख **एलोहिम** बरोबर झालेली आहे, असे म्हणता येईल. ज्यांची त्याच्या बरोबर ओळख झालेली आहे, त्यातील अनेक जणांची त्याची ओळख असून देखील, त्यांनी त्याचे गौरव केले नाही, आणि त्याचे स्तवन देखील केले नाही. ह्याबाबत प्रेषित पौल रोमच्या मंडळीला बोधपत्रातून स्पष्ट दाखवित आहे.

९ ) " **एलोहिम**ला ओळखुन सुद्धा त्यांनी **एलोहिम** म्हणून त्याचे गौरव केले नाही, किंवा त्याचे आभार मानले नाही." रोम १ ः २१. " आणि अविनाशी **एलोहिम** च्या गौरवाची, नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशु, व सरपटणारे प्राणी ह्यांच्या प्रतिमेच्या रूपाशी त्यांनी आदला बदल केली." रोम १ ः २३.

प्रेषित पौल हा ख्रिस्ती मंडळयांना त्यांच्यामध्ये करीत असलेल्या पापाबद्दल उघडरित्या दाखवित आहे.

ही असली पापे इस्त्राएल लोकांनी करू नये , म्हणून **एलोहिम**ने त्यांना अगाऊ आज्ञा केलेली होती , हे अनुवाद ४ ः १५ ते १९ मध्ये स्पष्ट दाखविलेले आहे. **एलोहिम** ची ओळख असताना , जो नंतर **एलोहिम**ला विसरतो , तेंव्हा तो ते पाप करतो. ह्या बाबत स्तोत्रसहिता ५० ः २२ मध्ये तो सांगतो.

" अहो **एलोहिम** ला विसरणा-यांनो ह्याचा विचार करा , नाही तर मी तुम्हांस फाडून टाकीन , तेव्हां तुम्हांस कोणी सोडविणारा सापाडावयाचा नाही ." स्तोत्र ५० ः २२.

**एलोहिम** च्या नावांची ओळख , व व्यक्तीशः **एलोहिम** ची ओळख , हे महत्वाचे आहे. ह्या ओळखीमध्ये दोघांनी एकमेकांना ओळखणे हे महत्वाचे व जरूरीचे आहे. **एलोहिम**ने आम्हांस ओळखणे हे जरूरीचे आहे , आमची व **एलोहिम**ची पूर्ण ओळख झाल्यावरच , तो स्वतः नाते संबंध जोडतो. त्याची पूर्ण ओळख झाल्याशिवाय तो कोणाही बरोबर संबंध जोडत नाही , कारण तो त्याला ओळखीत नाही.

प्रेषित पौल ह्याबाबत सविस्तर दाखवित आहे , " तथापि **एलोहिम**ने घातलेला स्थिर पाया टिकून राहतो. त्यावर हा शिक्का मारलेला आहे. **अदोनाई** आपले जे आहेत त्यांना ओळखतो , आणि जो कोणी **मशीहा**चे नाव घेतो त्याने अनीतिपासून दुर रहावे." २ रे तीमथी २ ः १९.

मोशे हा कोरह व त्याच्या साथीदारांना सांगत आहे , " **याव्हे आदोनाय** चे कोण व पवित्र कोण हे **याव्हे आदोनाय** उद्या सकाळी दाखवील , व त्याना आपल्या जवळ येऊ देईल. ज्याला तो निवडील त्याला तो आपल्या जवळ येऊ देईल." गणना १६ ः ५.

आणि **येशूवाह मशीहा** सांगत आहे , " मी उत्तम मेंढपाळ आहे , तसे जे माझे आहेत त्यांना मी ओळखितो , व जे माझे आहेत ते मला ओळखतात." योहान १० ः १४.

" माझ्या बापाने माझ्या हाती सर्व काही दिले आहे , आणि बापावाचून मुलाला कोणी ओळखीत नाही. आणि मुलावाचून व ज्या कोणास त्याला प्रगत करावयाची मुलाची इच्छा असेल , त्याच्यावाचून बापाला कोणी ओळखीत नाही." मत्तय ११ ः२७.

ज्यांची **एलोहिम** बापाबरोबर ओळख झाली आहे , त्याने **अदोनाई येशूवाह मशीहा**ला ही ओळखीले आहे. आणि ज्याची पुत्राबरोबर ओळख झाली आहे , त्याने पित्याला देखील ओळखीले आहे. जगामध्ये असंख्य ख्रिस्ती म्हणवून घेणारे लोक आहेत , ह्यामध्ये अनेक धर्माधिकारी वर्ग , व सर्वसामान्य लोक आहेत. ह्यांना **एलोहिम**च्या नावांची ओळख नाही , व **एलोहिम** बरोबर व्यक्तीशः ओळख ही नाही , आणि **एलोहिम** बरोबर संबंध ही जोडलेले नाहीत.

**एलोहिम** ची हिब्रु भाषेतील जी नावे आहेत , त्या नावामध्ये जे रहस्यमय अर्थ आहेत , तो अर्थ त्याच्या लोकांना त्याची पूर्ण ओळख होण्यास , कशा प्रकारे उपयुक्त पडते. हे त्या शब्दाच्या अर्थावरून पहावयास मिळते.

**याव्हे** ह्या शब्दाला जोडून दुसरा एक शब्द आहे , असे एकुण दहा समांतरीत शब्द जुन्या करारात आहेत , त्या शब्दांची तपशिल माहिती आपण पाहु .

* नवर १ ला . יְהוָה–רְ אֶה **याव्हे - यीरे** . म्हणजे **याव्हे** पाहुन देईल . ( प्रारंभ २२ ः १४)

अब्राहाम हा जेव्हां इसाहाकाचे अर्पण याव्हे आदोनाय ला ज्या ठिकाणी करत होता , त्या जागेचे नाव अब्राहामाने **याव्हे - यीरे** असे ठेविले .

* नवर२रा . יְהוָה– רְפָא **याव्हे-राफा** . म्हणजे तुला रोग मुक्त करणारा **याव्हे** . (निर्गम१५ः२६)

मारा नावाच्या एका ठिकाणी इस्त्राएल लोक आले, तेथले पाणी फार कडू आसल्यामूळे त्यांना ते पाणी पिववेना ,म्हणून त्या जागेचे नाव मारा असे पडले . ( निर्गम १५ ः २३ )

निर्गम १५ ः २६ . मधील **याव्हे - राफा** . मधील **राफा** हा शब्द फक्त हिब्रु मूळ बायबल मध्ये पहावयास मिळतो . परंतु इतर भाषांतरीत झालेल्या बायबल मध्ये तो शब्द पहावयास मिळत नाही .

* नवर ३रा . יְהוָה– קָדֵשׁ **याव्हे–मे क्वादोश** . म्हणजे पवित्र करणारा **याव्हे** . ( निर्गम ३१ः१३)

मे क्वादोश हा शब्द फक्त मूळ हिब्रु बायबल मध्ये पहावयास मिळतो , परंतु तो शब्द इतर भाषांतरीत झालेल्या बायबल मध्ये पहावयास मिळत नाही .

इस्त्राएल लोकांनी शब्बाथ पाळण्याकरिता , जेंव्हा **याव्हे** आदोनाय ने आज्ञा केली , तेव्हां तो स्वतः सांगतो .

" तुम्हांला पवित्र करणारा मी **याव्हे – मे . क्वादोश** आहे . " ( निर्गम ३१ ः १३ )

* नवर ४था . יְהוָה–נִסִּי **याव्हे–निस्सी** . म्हणजे **याव्हे** आदोनाय माझा झेंडा आहे . ( निर्गम १७ः१५)

जेव्हां यहोशवाने अमालेक लोकांचा समुळ नाश केला , तेंव्हा मोशेने तेथे एक वेदी बांधून तिचे नाव त्याने **याव्हे - निस्सी ( याव्हे माझा झेंडा )** असे म्हंटले आहे , येथे वेदीला मोशे हा **याव्हे**चा झेंडा असे दर्शवित आहे .

* नवर ५ वा . יְהוָה – שָׁלוֹם **याव्हे–शालोम** . म्हणजे शांतीदाता **याव्हे** आदोनाय . ( शास्ते ६ ः २४)

जरी काही भाषांतरीत बायबल मध्ये क्षेम हा शब्द दाखवित आहे , पण वचनात **याव्हे** आदोनाय गीदोनाला शांती असो , हे शास्ते ६ ः २३ मध्ये दाखविलेले आहे .

**शालोम** ... ह्या मूळ हिब्रु शब्दामध्ये पुढील अर्थाचे शब्द पहावयास मिळतात . शांती , सलाम , एकोपा , भरभराट , पूर्णता , व परीपूर्णता , ह्या अर्थाचे शब्द पहावयास मिळतात . म्हणुन यशया संदेष्टा हा , **येशूवाह**

**मशीहा**ला देखील **शांतीचा राजकुमार** म्हणून, यशया ९ः ६ . मध्ये दाखवित आहे . गीदोनाला **याव्हे शालोम** हा शब्द कसा वापरलेला आहे , ते वचनातून पाहू .

" **याव्हे** आदोनाय त्याला म्हणाला तुला शांती असो भिऊ नको , तू मरावयाचा नाही . "शास्ते ६ ः २३ .

" मग गीदोनाने तेथे **याव्हे** आदोनाय प्रीत्यर्थ वेदी बांधली , व तिचे नाव **याव्हे - शालोम** ( **शांतीचा याव्हे** ) असे ठेविले . " शास्ते ६ ः २४ .

* नवर ६ वा . יְהוָה צְבָא **याव्हे–त्साबा** . म्हणजे सैन्याचा **याव्हे** आहे . (१ ले शमुवेल १ः३)

एली याजक हा एलकाना बाबत सांगतो की , हा **याव्हे** आदोनाय **त्साबा** ला म्हणजे **सैन्याचा याव्हे** ह्याची आराधना व होमार्पण करण्यास दरवर्षी येथे येतो .

* नवर ७ वा . יְהוָה עֶלְיוֹן **याव्हे–एलयोवन** . म्हणजे परात्पर **याव्हे** आहे . (स्तोत्र ७ ः १७)

परात्पर ह्या भाषांतरीत शब्दाला हिब्रु मूळ भाषेमध्ये **एलयोवन** हा शब्द पहावयास मिळतो , **याव्हे एलयोवन** .

* नवर८ वा . יְהוָה רֹעָה **याव्हे–राई** . म्हणजे **याव्हे** आदोनाय माझा मेंढपाळ आहे . (स्तोत्र २३ः१)

दाविद राजा हा स्तोत्रसहिता मध्ये **याव्हे**ला , माझा मेंढपाळ , म्हणून दाखवित आहे .

* नवर९ वा . יְהוָה צֶדֶק **याव्हे–त्सडेक्व** . म्हणजे **याव्हे**आदोनायआमची धार्मिकता आहे . (यिर्मया२३ः६)

**याव्हे** आदोनाय स्वतः यिर्मया संदेष्ट्याव्दारे इस्त्राएल लोकांबरोबर बोलला . जेव्हां इस्त्राएल धार्मिक जीवन जगेल , तेव्हां त्यांची धार्मिकता ही **याव्हे** आदोनाय आहे , असे दाखविलेले आहे .

* नवर १० वा . יְהוָה שָׁמָּה **याव्हे–शाम्मा** . म्हणजे येथे **याव्हे** आदोनाय आहे . (यहेज्केल ४८ः३५)

**याव्हे** आदोनाय हा यहेज्केल संदेष्ट्याला सांगत आहे , " या नगराचे नाव येथून पुढे **याव्हे शाम्मा** , म्हणजे येथे **याव्हे** आदोनाय आहे , असे पडेल . " ( **याव्हे - शाम्मा** )

अशा प्रकारे ही दहा शब्द आपण पाहिले आहेत , आणि **याव्हे** ह्या नावाबरोबर जो दुसरा शब्द जोडलेला आहे , त्या शब्दाचा शिर्षक व अर्थ जो आहे तो आपण पाहु .

| | | | |
|---|---|---|---|
| १ ) | **याव्हे** पाहुन घेऊल ......... | म्हणजे | पुरवणारा . |
| २ ) | रोग मुक्त करणारा आहे . | म्हणजे | आरोग्य देतो . |
| ३ ) | **याव्हे** पवित्र करणारा आहे ... | म्हणजे | पवित्र व अभिषिक्त करतो . |
| ४ ) | **याव्हे** माझा झेंडा आहे ( मुळात वेदी ). | म्हणजे | समर्पण . |

५ ) शांतीचा **यात्वे**........... म्हणजे शांतीदाता .

६ ) सैन्याचा **यात्वे** . म्हणजे संरक्षक .

७ ) परात्पर **यात्वे** . म्हणजे उंचाविणारा .

८ ) **यात्वे** माझा मेंढपाळ आहे म्हणजे पालणकर्ता .

९ ) **यात्वे** आमची धार्मिकता . म्हणजे धार्मिकता .

१० ) **यात्वे** येथे आहे . म्हणजे समक्षता .

अशा प्रकारे हे दहा वेगवेगळी अर्थ भरीत नावे **यात्वे** ह्या शब्दाबरोबर दाखविलेले आहेत .

**एलोहिम** बरोबर ज्याची ओळख झालेली आहे , त्याच्या जीवनात तो ह्या दहा प्रकारे कार्यरथ रहातो .

ह्या दहा ही बाबी आध्यात्मिकते मध्ये फार महत्वाच्या आहेत . मानवाला स्वतःच्या आत्म्याव्दारे **एलोहिम** बरोबर संबंध जोडावे लागतात . ज्याला **एलोहिम**च्या नावांची ओळख झाली , व नंतर त्याची व्यक्तीशः ओळख झाल्यावर , त्याच्या बरोबर संबंध जोडण्याकरिता , तो ह्या दहा बाबींची परीपूर्णता करतो .

१ . तो पाहुन देतो , २ . तो आरोग्य देतो , ३ . तो पवित्र व अभिषिक्त करितो , ४ . त्याला त्या व्यक्तीने पूर्ण समर्पण करणे जरूरीचे आहे , ५ . तो आध्यात्मिक शांती देतो , ६ . जो त्याच्या बरोबर चालतो त्याचे तो संरक्षण करितो , ७ . तो त्याच्या सेवकास उंचावितो , ८ . तो त्याच्या सेवकाचा पालणकर्ता आहे , ९ . जे सेवक धार्मिक जीवन जगतात त्यांची धार्मिकता तो आहे , १० . त्याच्या सेवकांनी त्याच्या पवित्र समक्षतेमध्ये चालणे हे फार जरूरीचे आहे .

**एलोहिम**ची व्यक्तीशः ओळखीबाबत खाली दिलेले मुद्दे हे फार महात्वाचे आहेत . त्या बावत माहिती असणे हे फार जरूरीचे आहेत , ते पुढील प्रमाणे आहेत .

१ . तो माझा निर्माण कर्ता असून , त्याने मला निर्माण केलेले आहे .

२ . मला निर्माण करण्यावावत त्याचा जो उद्देश आहे , तो मी जाणून घेतला पाहिजे .

३ . त्याच्या आज्ञा व नियम पाळल्याने तो मला सर्व प्रकारे साहाय्य करितो .

४ . तो माझ्या आत्म्याचा तारणारा आहे .

५ . तो माझा पालणकर्ता आहे .

६ . तो माझ्या सर्वस्वावर मालक आहे , माझ्या संपूर्ण जीवनावर त्याचा अधिकार आहे , म्हणून मला त्याच्या अधिकारामध्येच राहिले पाहिजे .

७.**एलोहिम** हा दयाळू , आणि मंदक्रोध , आणि क्षमाशील , आणि तारण करणारा , आणि लालनपालन कर्ता , आणि संरक्षक असा तो आहे.

८.**एलोहिम** हा न्यायाधिश आहे , आणि तो शिक्षा देखील करणारा आहे , आणि तो नाश करणारा आहे हे मला विसरून चालणार नाही.

ह्या सर्वाबाबत आम्हांला **एलोहिम**ची व्यक्तीशः ओळख होणे हे फार जरूरीचे आहे.जेंव्हा त्याची व आपली पूर्ण ओळख होते , आणि आपण त्याच्या इच्छेनुसार सर्वाबाबींची परीपूर्णता करतो , जेंव्हाच तो आपल्या बरोबर संबंध जोडतो , आपण त्याबाबत परीपूर्णता केली नाही तर तो संबंध जोडत नाही.

स्तोत्र १00 :३. " **याव्हे आदोनाय** हाच **एलोहिम** आहे , हे जाणा (ओळख ) त्यानेच आम्हांस उत्पन्न केले."

हे एक फार मोठे सत्य आहे की , जे जगातील व ख्रिस्ती म्हणवून घेणा-या लोकांना अजून पर्यंत **याव्हे आदोनाय** हा कळालाच नाही.हे सत्य आहे की , त्या **एलोहिम**ला ओळखण्याकरिता व संबंध जोडण्याकरिता , मानवाला प्रथम , प्रयत्नाची शिकस्त करून **एलोहिम**ला शोधावे लागेल.तो सहजासहजी सापडणारा **एलोहिम** नाही , तर जो पर्यंत मानव झटून व आस्थापूर्वक त्याला शोधत नाही , तो पर्यंत तो सापडणार नाही.आणि जगातील फार थोडे थोडक्याच लोकांना त्याची ओळख झालेली आहे.

पवित्र शास्त्रातील हे एक फार मोठे सत्य आहे की , ज्यांनी **एलोहिम**ला शोधले त्यांना तो सापडला आहे.आणि ज्यांना तो सापडला , त्यांनीच त्याच्या मधील सार्वकालिक जीवन प्राप्त करून घेतले आहे.हे स्वतः **येशूवाह मशीहाने** स्पष्ट सांगितलेले आहे.ते आपणास मत्तय ७ : १३ व १४ वचनामध्ये पहावयास मिळते.

वचन १३. " अरूंद दरवाजाने आत जा , कारण नाशाकडे जाण्याचा दरवाजा रूंद व मार्ग पसरट आहे , आणि त्यातून आत जाणारे पुष्कळ आहेत."

वचन १४. " परंतु जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरूंद व मार्ग संकोचित आहे , आणि ज्यांना तो सापडतो ते थोडके आहेत."

येथे मार्ग किंवा दरवाजा हा , **एलोहिम** म्हणजे **येशूवाह मशीहा** हा , आध्यात्मिकतेत रहस्यामध्ये दाखविलेला आहे.पवित्र शास्त्रामध्ये त्या **एलोहिम**ला शोधण्याकरिता सांगितलेले आहेत , त्या बाबत ची वचने पाहु. यशया ५५ : ६.मध्ये तो स्वतः शोधण्यास सांगत आहे.

स्तोत्र ३२ : ६.मध्ये तो शोधण्याची संधी देत आहे , तो आहे तो वरच त्याला शोधण्यास सांगितलेले आहे.

योहान ८ : २१.मध्ये तुम्ही **येशूवाह मशीहा**चा शोध कराल.२ रे करिंथ ६ : १,२.मध्ये त्याला शोधण्याचा समय अनुकुल आहे , तो वरच **एलोहिम**ला शोधावे लागेल.

उदा.जुन्या करारात अलीशा हा दुःखद घटनेमध्ये तो शोध घेत आहे, जेंव्हा एलीया हा अलीशाला सोडून गेल्यावर, तेंव्हा अलीशा हा २रे राजे २ः१४वचनात म्हणतो , एलीयाचा **एलोहिम याव्हे** आदोनाय काठे आहे ?

नवीन करारामध्ये देखील , जे ज्ञानी लोक हे बाळ **येशूवाह मशीहा**चा शोध करीत होते , आणि जेंव्हा त्यांनी त्याला शोधीले , तेंव्हा तो त्यांना सापडला.जो खरोखर **एलोहिम**चा शोध घेतो , त्याला तो सापडतो.परंतु प्रश्न हा आहे की , **एलोहिम**चा शोध घेण्याकरिता मानवास का सांगितले आहे ?

त्याचे उत्तर आहे , ज्याला त्याचे भय आहे , तोच त्याचा शोध करतो ,आणि जे त्याचे भय धरीत नाही , ते त्याचा शोध घेणार नाही , कारण ते त्याचे नाही.त्याला शोधल्या वरच त्याची ओळख करून घेता येते.सार्वकालिक जीवन प्राप्तीसाठी त्याला शोधल्या नंतर , त्याच्या मधील जे सार्वकालिक जीवन प्राप्त करून घेण्याकरिता **एलोहिम** बरोबर पुढे संबंध जोडावे लागतात.

यशया संदेष्टा सांगतो , “ मीच **याव्हे** आदोनाय ; अन्य कोणी नव्हे.मज वेगळा **एलोहिम** नाही ; तू मला ओळखत नव्हतास तरी मी तुला सज्ज केले.” यशया ४५ ः ५.

प्रेषित पौल सांगतो , “आपल्याला जगाचा आत्मा नव्हे , तर **एलोहिम** पासून निघणारा आत्मा मिळाला आहे ; ह्यासाठी की ,जे **एलोहिम**ने आपल्याला कृपेने दिलेले आपण ओळखून घ्यावे.”१ले करिंथ २ः१२.

प्रेषित पौल सांगतो , “ तथापि पूर्वी तुम्ही **एलोहिम**ला ओळखीत नव्हता , तेंव्हा जे वस्तुत ः **एलोहिम** नाहीत त्याचे गुलाम होता.” गलती ४ ः ८.

“ पण आता तुम्ही **एलोहिम**ला ओळखता, किंबहुना **एलोहिम** ने तुमची ओळख करून घेतली.”गलती ४ः९.

संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये त्या **एलोहिम**ला ओळखण्याबावत , अनेक वचने दिलेली आहेत.जेंव्हा आपापसात एकमेकांबरोबर पूर्ण ओळख झाल्यावरच , **एलोहिम** त्या व्यक्तीबरोबर नाते जोडतो.आणि संबंध जोडल्या नंतरच **एलोहिम** पुढे नाते जोडतो. ह्या दुस-या भागामध्ये हे शिकलो की , त्या **एलोहिम** बरोबर संबंध जोडण्याकरिता त्याची व्यक्तीशः ओळख होणे , हे फार जरूरीचे आहे.

आपण **एलोहिम**ची व्यक्तीशा ओळख करून घेतली आहे काय ? नसेल तर आताच , त्याची ओळख करून घ्या. ह्या पहिल्या विषयातील तिसरा भाग पुढे चालू असून , त्यामध्ये **एलोहिम**च्या ओळखीसह , त्याच्यावरोबर नाते संबंध जोडणे.

**अदोनाई**ची स्तुती असो. **आमेन** , **आमेन** ,, **आमेन** ,,,

.................... पुढे कमशा.

* * * * * * * *

יְהוָה–רְאֶה

יְהוָה– רָפָא

יְהוָה– קָדֵשׁ

יְהוָה–נִסִּי

יְהוָה – שָׁלוֹם

יְהוָה– צְבָא

יְהוָה– עֶלְיוֹן

יְהוָה – רָעָה

יְהוָה – צֶדֶק

יְהוָה – שָׁמָּה




# संदेश व शिक्षण

विषय ः - पहिला . भाग ः ३ रा .

विषय ः - एलोहिमच्या ओळखीबरोबर , आपले व्यक्तीशा नाते संबंध जोडणे .

विषय ः पहिला .                    भाग ३ रा .

विषय ः - **एलोहिम**च्या ओळखीबरोबर , आपले व्यक्तीशा नाते संबंध जोडणे .

भाग पहिल्या मध्ये आपण पाहिले की , **एलोहिम**ची मूळ नावे व मानावाने त्याच्या नावामध्ये विपरीत व अनधिकृतपणे केलेली आदलाबदल .

भाग दुस-या मध्ये आपण पाहिले की , **एलोहिम**ची व्यक्तीशा ओळखी .

आणि भाग तिस-या मध्ये आपण पहाणार आहोत की , **एलोहिम**च्या ओळखीबरोबर , आपले व्यक्तीशा नाते संबंध जोडणे . संबंध ठेवणा-यामध्ये दोन भाग पहावयास मिळतात .

पहिले = चांगल्या व्यक्तीबरोबर चांगले संबंध, व दुसरे = वाईट व्यक्तीबरोबर वाईट संबंध .

जगातील मानवांची विभागणी ह्या दोन विभागामध्ये झालेली आहे , हे पहावयास मिळते . मानवांचे जे संबंध आहेत , ते जन्मापासूनच वाईटाबरोबर , म्हणजे सैतानाबरोबर जोडले गेलेले आहेत . **एलोहिम**ने ज्या मानवाला निर्माण करून सर्व काही त्याला दिले , मानवाने त्या **एलोहिम**च्या आज्ञेचा भंग करून , व पाप करून सर्व जे चांगले संबंध ते तोडून टाकले . आणि मानवाने सर्व काही गमवून , सर्व चांगले संबंध तोडून , सरते शेवटी मरणाची शिक्षा ओढावून घेऊन नाश करून घेतला . आता हे तुटलेले संबंध , **एलोहिम** पुन्हा जोडण्यास तयार आहे . परंतु ते संबंध जोडण्याकरिता मानवाला त्याच्या ज्या काही अटी आहेत , त्या सर्व पूर्ण कराव्या लागेल . जे पापामध्ये राहाणारे माणसे आहेत , त्यांच्या बरोबर **एलोहिम** , कधीही संबंध जोडत नाही .

जे **एलोहिम**ला शोधतो , व पाप विरहीत जीवन जगतो , त्या मानवा बरोबरच तो आपले संबंध जोडतो . त्या महान व सर्वशक्तीमान **एलोहिम** बरोबर , जे संबंध जोडावयाचे आहेत , ते नातेवाईका प्रमाणेच जोडावयाचे आहेत . सर्वात प्रथम असलेल्या नात्यासंबंधा बाबत , आपल्याला पहावयास मिळते, जे नाते **एलोहिम** व आदाम ह्या दोघांमध्ये पहावयास मिळते, ते नाते असे असले पाहिजे . त्या वेळेस हव्वा बाई ही नव्हती . ह्या दोघांमध्ये कोणते नाते होते , ह्याचा आध्यात्मिक दृष्टीकोणातून बारकाईने अभ्यास करावा लागेल . जरी **एलोहिम** हा निर्माता आहे, आणि आदाम हा निर्मीती आहे , पण आध्यात्मिकते मध्ये रोम ८ ः १४ च्या वचनानुसार पहावे लागेल .

प्रेषित पौल सांगतो , " कारण जितक्यांना **एलोहिम**चा आत्मा चालवितो , तितके **एलोहिम**चे मुलगे आहेत ." रोम ८ ः १४ .

आता आदामा बाबतची जी तपशिल माहिती आहे ती पाहु , आदामाला जीवंत कसे केले आहे ? ते रहस्य उलगडा करून पाहु .

" आणि **याव्हे** आदोनाय **एलोहिम** ने जमिनीतल्या मातीचा मनुष्य घडविला, आणि त्याच्या नाकपुडयांत जीवनाचा श्वास (आत्मा ) फुंकला , आणि मनुष्य देहधारी सजीव झाला ." प्रारंभ २ ः ७ .

जीवनाच्या आत्म्याबाबत **येशूवाह मशीहा** हे दाखवित आहे की ,

" आत्मा हा जीवंत करणारा आहे , देहापासून लाभ नाही ; मी जी वचने तुम्हांस सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहे ." योहान ६ ः ६३ .

दैहिक शरीर व आध्यात्मिक (आत्मीक ) शरीर जीवंत होण्याकरिता , **एलोहिम**च किंवा **मशीहा**चा अथवा **पवित्र आत्मा** हा मिळल्या नंतरच हे दोन्ही म्हणजे दैहिक व आत्मीक देह जीवंत होतात .

जर आत्मा नाही तर हे दोन्ही शरीर जीवंत होऊ शकत नाही .दैहिकते मध्ये जीवंत होण्याबाबत आपणा सर्वास आदामाचे उदाहरण पहावयास मिळते , तसेच आध्यात्मिकते मध्ये ( आत्मीक ) जीवंत होण्याबाबत नवीन करारामध्ये हे देखील पहावयास मिळते .

जेंव्हा ख्रिस्तविरोधकाने **एलोहिम**च्या दोन साक्षीदारांना जीवे मारले , त्यानंतर ची घटना ही पुढे पहावयास मिळते .

" मग साडेतीन दिवसानंतर जीवनाचा आत्मा **एलोहिम** पासून येऊन त्यांच्या मध्ये शिरला तेव्हां ते आपल्या पायावर उभे राहिले ." प्रकटी ११ ः ११ .

जेंव्हा आदाम **एलोहिम**च्या पवित्र आत्म्याने सजिव झाला , त्यानंतर आदामाला देखील **एलोहिम** प्रमाणेच अमरत्व प्राप्त झाले होते .अर्थात तो **एलोहिम**चा मुलगा असा झाला , आणि ज्या प्रमाणे **एलोहिम**चा प्रथम आत्मीक मुलगा , म्हणजे **मशीहा**ला सर्व अदृश्य व आकाशातील सर्व अधिकार त्याला सोपवून दिले , तसेच **एलोहिम**चा दुसरा मुलगा आदाम , ह्याला देखील त्याने सर्व दृश्य निर्माण केलेल्या सर्वावर अधिकार सोपवून दिला .आणि हे सर्व आपणास प्रारंभ १ ः २६ ते २८ वचनात पहावयास मिळते .

म्हणून नवीन करारामध्ये **येशूवाह मशीहा**ला देखील , आदाम हा शब्द वापरलेला आहे , हे पहावयास मिळते. १ ले करिंथ १५ ः ४५ व ४७ वचनामध्ये. वचनानुसार पाहिले , तर **मशीहा** हा **याव्हे** आदोनायचा जेष्ठ म्हणजे थोरला मुलगा आहे , आणि **याव्हे** आदोनायचा धाकटा मुलगा हा आदाम ( मानव ) आहे.म्हणून **येशूवाह मशीहाने** हा धाकटा मुलगा उधळया दाखविलेला आहे , हे लूक १५ः ११ते ३२ मध्ये पहावयास मिळते.आदामाला मिळालेले सर्व अधिकार तो त्याने सर्व गमवून बसला , आणि तो दोषी आढळला.आणि सर्व प्रकारचे **एलोहिम** बरोबर असलेले नाते हे तोडून , आदाम हा एकटाच राहिला. आदामासमान जगातील सर्व मानवांची समान वस्तुस्थिती आहे , हे पहावयास मिळते.

**एलोहिम**ने त्याच्या जेष्ठ मुलगा **मशीहा** ह्याच्या व्दारे , त्याने मानवाबरोबर पुन्हा नाते संबंध जोडण्याची महान योजना तयार केली.आम्हां प्रत्येकाला त्या **एलोहिम** बरोबर नातेसंबंध जोडण्याचे मुख्य कारण की , आमच्या आत्म्याचा नाश होऊ नये , तर त्याच्याव्दारे मिळणारे सार्वकालिक जीवन आमच्या आत्म्याला मिळावे.सध्याच्या जगातील मानवाची सत्य वस्तुस्थिती ही आहे की ,

पहिले = त्यांना **एलोहिम**च्या मूळ नावांची माहिती नाही.

दुसरे = त्या **एलोहिम** बरोबर व्यक्तीशा ओळख नाही.

आणि तिसरे = त्या **एलोहिम** बरोबर कोणत्याही प्रकारचे नातेसंबंध जोडलेले नाही. सध्याच्या युगातील मानवाला त्या **एलोहिम** बरोबर नातेसंबंध जोडणे , ही फार कठीण बाब आहे.**मशीहाला** ह्या सर्व घडणा-या घटनेबाबत पूर्वज्ञान होते , हे प्रेषित पौल स्पष्ट सांगतो.

“ कारण ज्याच्या विषयीचे त्याला पूर्वज्ञान होते त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून त्याने त्याला अगाऊच नेमून ठेविले ,ह्यात हेतू हा की, तो पुष्कळ बंधुजनामधला ज्येष्ठ असा व्हावा.” रोम ८ ः २९.

पतन पावणा-या जगातील सर्व धाकटया मुलांना , **एलोहिम**ने स्वतःचा ज्येष्ठ पुत्र **मशीहा** मध्ये , **एलोहिम**चे पुत्र होण्याकरिता पुन्हा बोलविलेले आहे.

“ ज्याने स्वपुत्र **येशूवाह मशीहा** आपला **अदोनाई** ह्याच्या सहभागीपणांत तुम्हांला बोलाविले तो **एलोहिम** विश्‍वासनीय आहे.” १ ले करिंथ १ ः ९.

जो मनुष्य **येशूवाह मशीहा** मध्ये , **एलोहिम** बापाबरोबर पुन्हा मुलाचे नातेसंबंध जोडतो , त्या मुलांना कोणत्या गोष्टी त्या **मशीहाच्या** व्दारे प्राप्त होतात , ते प्रेषित पौलस दाखवित आहे .

" **एलोहिम** कडून तुंम्ही **मशीहा येशूवाह** मध्ये आहा , त्या **एलोहिम** पासून आपल्याला ज्ञान म्हणजे नीतिमत्व आणि पवित्रीकरण व खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे ." १ ले करिंथ १ ः ३0 .

मूळ धाकटया मुलाच्याव्दारे म्हणजे , आदामाव्दारे इतर पुढील सर्वच मुलांचा ( मानवाचा ) नाश होऊ नये म्हणुन , **एलोहिम**चा आत्मीक मुलगा **मशीहा** ह्याच्याच्दारे , जे नाश पावणारे मुले होते , त्यांचा बचाव करून त्यास मुलाचे अधिकार , **मशीहा**ने पुन्हा प्राप्त करून दिले आहे .जे मानव शुध्दीवर येऊन , व पश्चात्ताप करून , त्या **एलोहिम** बापाजवळ गेले , त्यांना **एलोहिम**ने क्षमा केली . हे **मशीहा**ने वचनामधून दाखविलेले आहे , लूक १५ः २0 ते २४ मध्ये की, पश्चात्तापी मुलांना **एलोहिम** क्षमा करतो .त्यासोबत त्याला पुन्हा मुलगा होण्याचा अधिकार दिलेला आहे , आणि ह्या अधिकार दर्शक ज्या वस्तु आहे , त्यामध्ये १ ) झगा , २ ) अंगठी , ३ ) जोडा हे दाखविलेले आहेत .

आता **एलोहिम**च्या नावाची ओळख झाली , व त्याची व्यक्तीशा ओळख झाली , आणि त्या **एलोहिम** बरोबर नातेसंबंध जोडले जात आहे . **एलोहिम** हा स्वतःचे मुलगे व कन्या हे नातेसंबंध तो जोडतो , तर **मशीहा** हा त्याचे धाकटे भाऊ ह्याचे नातेसंबंध जोडतो .जेंव्हा ह्या दोघाबरोबर नातेसंबंधाची परीपूर्णता होते , तेंव्हाच वतनाचा वारस हक्क अधिकारानेच प्राप्त होतो .

" आपल्याला **एलोहिम**ची मुले हे नाव मिळाले , ह्यात **एलोहिम** बापाने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा . ......" १ ले योहान ३ ः १ .

" प्रियजन हो आपण आता **एलोहिम**ची मुले आहोत , आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रगट झाले नाही . ......" १ ले योहान ३ ः २ .

सुरूवातीस आपण पाहिले होते की , त्याच्या बरोबर नातेसंबंध जोडण्याकरिता त्याने काही शर्त ( अटी ) ठेविलेल्या आहेत . आणि जो पर्यंत त्या शर्त ( अटी ) मानव पूर्णकरीत नाही , तो पर्यंत तो नातेसंबंध जोडत नाही .

पहिली शर्त = पापापासून व आत्म्याच्या नाशवंत गोष्टी मधून बाहेर निघणे , किंवा वेगळे होणे .

यशया ५२ ः ११ .

दुसरी शर्त = जे अशुद्ध त्याला शिवू नका , ज्या पापामुळे जीव , आत्मा , आणि शरीर हे अशुद्ध होते , ते पापे करू नका . २ रे करिंथ ६ः १७ . जेव्हां ह्या सर्व शर्तीची पूर्णता होते , तेंव्हा तो त्याचा स्विकार करतो . खाली काही नाते दाखविलेले आहेत .

१ . मी त्याच्यामध्ये वास करून राहिल , अर्थात तो त्याच्या पवित्र आत्म्याद्वारे त्याचा तो अभिषिक्त करील .

२ . मी त्याचा **याव्हे** आदोनाय **एलोहिम** , म्हणजे देव होईल .

३ . ते माझे लोक होतील . ( ह्यामध्ये इस्त्राएल व परराष्ट्रीय लोक एकत्र आहेत )

४ . मी त्यांचा पिता असा होईन . ( जरी निर्मीत्ता असलो , तरी माझे मुले ह्या नात्याने मी त्यांचा पिता होईल ) यशया ४३ ः ६ , ७ .

५ . आणि तुंम्ही मला पुत्र व कन्या अशी व्हाल , आणि हे सर्वसमर्थ ( म्हणजे **एल-शाद्दाय** ) **अदोनाई** म्हणतो . २ रे करिंथ ६ः १६ ते १८ .

जो ह्या सर्व शर्ती पूर्ण करतो , त्यालाच हे सर्व त्याच्या कडून अधिकाराने मिळतील . आपण त्याच्या बरोबर नातेसंबंध जोडण्याकरिता वचनानुसार त्याच्या शर्ती पूर्ण केलेल्या आहेत काय ?

आदामानंतर , **एलोहिम**ने त्याचे पुत्र म्हणून इस्त्राएल लोकांबरोबर नातेसंबंध जोडले , त्यांना त्याने वचनपुत्र म्हणून संबोधिलेले आहे . परंतु इस्त्राएलने हे पुत्रात्वाचे नाते टिकवून ठेविले नाही, म्हणून **एलोहिम** ने परराष्ट्रातील जे त्याचा स्विकार करणारे लोक आहेत, त्यांना त्याने दत्तक पुत्र हे नातेसंबंध जोडले आहे . दत्तक पुत्राचे नाते हे , **एलोहिम**ने त्याच्या ज्येष्ठ पुत्र **येशूवाह मशीहा**व्दारे जोडण्यांची योजना तयार केली .

प्रेषित योहान मंडळयांना सागतो , “ ती साक्ष हीच आहे की , **एलोहिम**ने आपल्याला सार्वकालिक जीवन दिले . आणि हे जीवन त्याच्या पुत्राच्या ठायी आहे ; “ ज्याला तो पुत्र लाभला आहे त्याला जीवन लाभले आहे ; ज्याला **एलोहिम**चा पुत्र लाभला नाही त्याला जीवन लाभले नाही . ” १ ले योहान ५ ः ११ व १२ .

ज्याप्रमाणे वचन पुत्र इस्त्राएल लोकांनी **मशीहा**चा स्विकार केला नाही ,

प्रेषित योहान सांगतो , " जे त्याचे स्वतःचे त्याकडे तो आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्विकार केला नाही ." योहान १ : ११ .

त्याच प्रमाणे दत्तक पुत्र , जे सर्व जगातील ख्रिस्ती म्हणवून घेणारे जे लोक आहेत , त्यांच्यातील अनेकांनी देखील **मशीहा**चा स्विकार केला नाही .

प्रेषित योहान सांगतो , " तो जगात होता व जग त्याच्याव्दारे झाले तरी जगाने त्याला ओळखीले नाही ." योहान १ : ११ .

सध्याच्या काळातील मानव हा, त्या **एलोहिम** बरोबर , किंवा त्याचा पुत्र **मशीहा** बरोबर नातेसंबंध जोडण्यास तयार नाही . हे स्पष्ट दिसून येते की, जे मानव **एलोहिम**बरोबर नातेसंबंध जोडत नाही , त्यांना त्यांच्या आत्म्याला **मशीहा** मधील सार्वकालिक जीवन मिळवून घेण्याची इच्छा नाही . ह्या भूतलावरील मानवाला त्याच्या जीव , आत्मा , व शरीर ह्याच्या व्दारे , त्या आध्यात्मिक **एलोहिम** बरोबर नातेसंबंध जोडावयाचे आहेत .

पहिले नाते = **याव्हे** आदोनाय **एलोहिमने** मानवाबरोबर वडीलांचे नाते जोडलेले आहे ,आणि मानवाला मुले ह्या नात्यामध्ये अधिकार दिलेले आहेत .

दुसरे नाते = जे **याव्हे** आदोनाय चे पवित्र जण आहेत , त्यांना **येशूवाह मशीहाने** त्याच्या बरोबर मित्रत्वाचे नातेसंबंध जोडलेले आहेत .

स्वतः **येशूवाह मशीहा** सांगतो , " मी आतापासून तुंम्हाला दास म्हणत नाही ; कारण धनी काय करतो ते दासाला ठाऊक नसते ; परंतु मी तुम्हांला मित्र म्हंटले आहे . ..." योहान १५: १५ .

**येशूवाह मशीहा** हा सांगतो , लूक १२ : ४ मध्ये , माझ्या मित्रांनो म्हणून म्हणत आहे .

**याव्हे** आदोनाय ने देखील , जुन्या करारामध्ये त्याच्या सेवकाला तो मित्र म्हणून म्हणत आहे . " अब्राहामाने **एलोहिम**वर विश्वास ठेविला , आणि ते त्याला नीतिमत्व असे गणण्यात आले; आणि त्याला **एलोहिम**चा मित्र म्हणण्यात आले, हा शास्त्रलेख पूर्ण झाला ." याकोब २: २३ .

**एलोहिमचा** मित्र  होण्याबाबत , शास्त्रलेखामध्ये अगाऊ  वचने लिहून ठेविलेली आहेत .

" हे आमच्या **एलोहिम** , तू आपल्या इस्त्राएल लोकांपुढून या देशातील लोकांना घालवून हा देश आपला मित्र अब्राहाम याच्या संततीला सर्वकाळ दिला नाही काय ? " २ रे इतिहास २०ः ७ .

" परंतु तू , हे इस्त्राएल , माझ्या सेवका , याकोबा , माझ्या निवडलेल्या , माझा मित्र अब्राहाम याच्या संताना . " यशया ४१ ः ८ .

जो मनुष्य **एलोहिम**समोर व **मशीहा**समोर विश्वासाच्याव्दारे नीतिमान ठरविला जातो , तोच त्यांचा मित्र  होऊ शकतो .

शलमोन राजा सांगतो , " मित्र  सर्व प्रसंगी प्रेम करितो, आणि विपत्कालासाठी तो बंधू म्हणून निर्माण झालेला असतो . " नीतिसूत्र १७ः १७ .

" जो पुष्कळ मित्र मिळवतो तो आपला नाश करून घेतो  परंतु एकादा असा मित्र असतो तो आपल्या बंधूपेक्षांहि आपणास धरून राहतो . " नीतिसूत्र १८ः २४ .

" स्वतःच्या व आपल्या बापाच्या मित्राला सोडू नको . " नीतिसूत्र २७ः १० .

**येशूवाह मशीहा** सांगतो , " आपल्या मित्राकरिता आपला प्राण दयावा ह्यापेक्षा कोणाची प्रीति मोठी नाही . " योहान १५ः १३ .

" मी तुम्हांस जे सांगतो ते तुम्ही कराल तर तुम्ही माझे मित्र आहा . " योहान १५ः १४ .

मानवाबरोबर  नातेसंबंध जोडण्याकरिता दोन जण प्रयत्न करतात . १ . स्वतः निर्मात्ता **एलोहिम** , व  २ . सैतान . ह्या दोघांकडे सपूर्ण जगातील मानवांची विभागणी झालेली आहे , हे पहावयास मिळते .

ज्याप्रमाणे  बापाचे , व धाकटया भावांचे आणि त्याचे मित्र ह्या नातेसंबंधातून संबंध जोडतो, ह्याचे मुख्य कारण की, त्या मानवाच्या आत्म्याचा नाश होऊ नये, तर त्याला  सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे .

त्याच प्रमाणे सैतान हा देखील बाप , व मित्र  ह्या संबंधातून खोटे नातेसंबंध जोडतो ते

ह्याकरिता की , मानवाच्या शरीराचा व आत्म्याचा नाश होण्याकरिता नातेसंबंध जोडतो .

हे नातेसंबंध आत्मिक असल्याने मानवाला जरी ह्याबाबत माहिती असली , तरी अनेक जण ही आत्मिक नातेसंबंध जोडत नाही . कारण मानवाला दैहिक व रक्तमांसाचे जे नातेसंबंधाबाबत माहिती असताना , तो ते संबंध व्यवस्थित जोडत नाही . मानव हा कर्तव्य व जबाबदारी आणि आपुलकी हे ठेवण्याकरिता तयार नाही . तर आध्यात्मिक व आत्मिक नातेसंबंध तो कसे जोडणार ?

जे दृश्य आहे ते तो मानत नाही , तर जे अदृश्य आहे ते तर नातेसंबंध मानणारच नाही . इतक्या महान व विश्व निर्मीत्त्या बरोबर तुंम्ही कसे नातेसंबंध जोडणार ?

कारण सध्याच्या युगातील मानवाला हे नातेसंबंध जोडणे फार कठीण व अशक्य बाब आहे . कारण त्याचे नाव घेणारे जे ख्रिस्ती लोक आहेत , त्यांना माहिती नाही . आता पर्यंत ते **एलोहिम**च्या नावा ऐवजी दुस-या परक्या देवांना हाक मारीत आहेत , आणि त्या देवा जवळ प्रार्थना करीत आहे .

मस्कील हा सांगतो , " आम्ही सतत **एलोहिम**ची प्रतिष्ठा मिरवतो , आणि तुझ्या नावाचे सर्व काळ उपकारस्मरण करतो . " स्तोत्र ४४ : ८ .

नावे माहिती नसल्याने त्या **एलोहिम** बरोबर ओळख देखील करू शकत नाही , आणि ओळख नसल्यामुळे ते नातेसंबंध हे देखील जोडू शकत नाही .

" जर आम्ही आपल्या **एलोहिम** चे नाव विसरलो असतो , व अन्य एल पुढे (एल म्हणजे देव) हात पसरले असते . " स्तोत्र ४४ : २० .

" तर **एलोहिम** ने हे शोधून काढले नसते काय ? " स्तोत्र ४४ : २१ .

विसाव्या वचानाकडे पुन्हा पाहु , " जर आम्ही आपल्या **एलोहिम** चे नाव विसरलो असतो , व अन्य एल पुढे (एल म्हणजे देव) हात पसरले असते . " खरोखर ख्रिस्ती लोकांना **एलोहिम** ची नावे माहिती नाही , किंवा अनेक जण त्याचे नाव विसरले म्हणून ते अन्य देवापुढे हात पसरवीतात , आणि त्यांच्या जवळ प्रार्थना करितात .

नातेसंबंधाबाबत आपण पाहिले आहे , ह्यामध्ये १ . वडिलांचे नाते ,२ . थोरल्या भावाचे नाते, ३ . प्रीति करणारा मित्राचे नाते ह्याबाबत पाहिले आहे . आता शेवटचे नातेसंबंध जे आहे , ते

मानवाच्या आत्म्याचे तारण करणारा , त्या तारणकर्ताबाबतचे नाते ह्या बाबत पहाणार आहोत . हे तारणकर्ताचे नाते फक्त त्या **एलोहिम**च्या नावांनेच जोडले जाते , इतर दुस-या अन्य दैवतांच्या नावाने तारण मिळत नाही . मानवाच्या आत्म्याकरिता हे चौथे नाते फार महत्वाचे आणि जरूरीचे आहे . जेंव्हा मानव त्या पहिल्या तीन नात्यांची परीपूर्णता करतो , तेंव्हाच **एलोहिम** हे पुढील चौथे नाते संबंध जोडतो .

दावीद राजा सांगतो " हे **एलोहिम** तू आपल्या नावांने मला तार , आपल्या सामर्थ्याने माझा न्याय कर ." स्तोत्र ५४ः १ .

" जो आभार रूपी यज्ञ करतो तो माझे गौरव करतो आणि जो सरळ मार्गाने चालतो त्याला मी **एलोहिम**ने सिद्ध केलेले तारण प्राप्त करून देईन ." स्तोत्र ५०ः २३ .

दावीद राजा सांगतो, "तुझी सत्यता व तू सिद्ध केलेले तारण मी विदीत केले ." स्तोत्र ४०ः १० .

प्रेषित पेत्र सांगतो, " आणि तारण दुस-या कोणाकडून नाही ; कारण जेणे करून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेहि नांव आकाशाखाली मनुष्यामध्ये दिलेले नाही ." प्रेषित ४ः १२ .

प्रेषित पौल सांगतो, " ह्यामुळे **एलोहिम**ने त्याला अत्यूच्च केले आणि सर्वनांवापेक्षा जे श्रेष्ठ नांव ते त्याला दिले ; " फिलिप्पै २ः ९ .

**एलोहिम** बापाची जी काही मूळ नावे आहे , ते परमपवित्र , श्रेष्ठ , आणि सामर्थ्यवान अशी आहेत . म्हणून त्याच्या मुलाला देखील जे त्याने नांवे दिले आहेत, ते देखील परमपवित्र , श्रेष्ठ , आणि सामर्थ्यवान अशी दिलेली आहे . जगातील मानवाने व बायबलचे भाषांतरण करणारे लोक ह्यांना , **एलोहिम**चे विषेश नावाचे जे महत्व आहे , त्याबद्दल त्यांनी ते महत्व जाणून घेतलेले नाही . तर सर्वसामान्य व दुस-यांची नावे **एलोहिम** बापाला व त्याच्या पुत्राला दिलेली आहे , हे स्पष्ट पहावयास मिळते . उदा . पुत्राच्या मूळ हिब्रु नावाबाबत पाहु , की ज्या मूळ हिब्रु नावामध्ये मानवाला तारण दिलेले आहे .

" आणि **एलोहिम** बापाच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने **येशूवाह मशीहा** हा **अदोनाई** आहे , हे कबूल करावे ." फिलिप्पै २ ः ११ .

हे मूळ हिब्रु भाषेतील नावे व उच्चाराची शब्द आहेत , ही नावे व उच्चारांची शब्द , कोणत्याही भाषांतरीत बायबल मध्ये असलेले हे पहावयास मिळत नाहीत . एखाद्दा मनुष्याची दुस-या मनुष्या बरोबर ओळख नसते , तेंव्हा त्या मनुष्याला त्याच्या नांवाची माहिती नसते . त्याच प्रमाणे त्या मनुष्याची व्यक्तीशा ओळख नसल्याने , त्याचे कोणत्या प्रकारे संबंध जोडलेले नसतात . अशा प्रकारे ख्रिस्ती म्हणवून घेणा-या व्यक्तींची अवस्था झालेली आहे .

इस्त्राएल लोकांचे उदाहरण घ्या , त्या इस्त्राएलांनी पिढयांन पिढया त्या **एलोहिम**च्या नावाची ओळख ठेविलेली आहे . त्यांची व **एलोहिम**ची व्यक्तीशा ओळख आहे . आणि त्यांचे नातेसंबंध पुर्वी प्रमाणेच तशीच राहिलेली आहे . ख्रिस्ती लोकांप्रमाणे इस्त्राएलाने जे **याव्हे** आदोनाय ने दिलेले धर्मशास्त्र त्यामध्ये , किंवा त्याच्या विषेश व परमपवित्र नावामध्ये , कोठेही दुस-या दैवतांची नावे टाकून नावामध्ये आदलाबदल केलेली नाहीत . वचनामध्ये जे काही मूळ हिब्रु नाव आलेले आहे , ते नाव तसेच त्या शब्दांचा उच्चार घेतात .

परंतु ख्रिस्ती लोकांना अधिकार नसताना देखील ,त्यामधील नावामध्ये आदलाबदल केली . जरी इस्त्राएल हे, **एलोहिम** पासून पापाच्याव्दारे दुरावलेले होते . आणि संपूर्ण जगामध्ये विखरलेले होते , तरी त्यांच्या पिढीने **एलोहिम**चे धर्मशास्त्र , त्याचे नाव ,आणि त्याचे संबंध हे कायम मूळ जे आहे , ते तसेच ठेविले . **एलोहिम**ने त्याच्या वचनाचे मूळ व सत्य त्याचे जे अवशेष , ते इस्त्राएलाव्दारे राखून ठेवलेले आहेत . ती मूळ वचने ही त्याची व इस्त्राएलाची , हिब्रु भाषा ह्याव्दारे त्याने जगामध्ये ठेविलेली आहे .

परंतु ख्रिस्ती भाषांतरण करणा-यांनी ह्या हिब्रु भाषेतील सत्यता राखून ठेविलेली नाही . आपापल्या भाषेमध्ये देखील त्या हिब्रु भाषेचे अवशेष राखून ठेविलेले नाहीत . ह्यामुळे ख्रिस्ती लोकांना **एलोहिम** बरोबर नातेसंबंध जोडणे हे फार कठीण आहे . जे मुळाबाबत पूर्ण जाणून घेईल, त्यालाच **एलोहिम**कडे स्वतः जाता येईल , व त्या **याव्हे** आदोनाय बरोबर नातेसंबंध जोडता येतील . सत्यामध्ये म्हणजे **येशूवाह मशीहाच्या** वचनात चालल्या शिवाय , किंवा स्विकारल्या शिवाय , कोणत्याही मानवाला त्याच्याबरोबर नातेसंबंध जोडता येणार नाही . आणि हेच ख्रिस्ती लोकांकरिता फार कठीण व अशक्य बाब झालेली आहे . ह्यामुळे सार्वकालिक जीवनापासून ख्रिस्ती लोक फार दूर आहे . हे नातेसंबंध न जोडल्याने त्यांना सार्वकालिक जीवन प्राप्त करून घेता येणार नाही .

जे नातेसंबंध तो जोडत आहे , ह्यामध्ये बापाचे , थोरल्या भावाचे , व मित्राचे , आणि तारणकर्ताचे नातेसंबंध तो जोडू इच्छीत आहे .

हे नाते तुंम्ही त्या **याव्हे** आदोनाय बरोबर खरोखर जोडू इच्छीता का ?

कारण यापूर्वी हे नाते कोणीही जगासमोर प्रसारीत केलेले नव्हते , आणि ते करण्यास देखील तयार नाही . वास्तविक त्यांच्या जवळ सर्वकाही भरपूर प्रमाणात साधने , आर्थीक साहाय्य , मानसे ही भरपूर आहे . पण **एलोहिम** च्या सत्य व मूळ वचनापासून दूर असल्याने त्यांच्या कडून **एलोहिम** हे त्याचे काम करू इच्छीत नाही . ह्या आमच्या छोटयाशा व थोडया थोडक्या कडूनच **एलोहिम** हे सर्व सत्य व मूळ वचने प्रसारीत करून घेत आहे . **एलोहिम**ने जे दिले ते आंम्ही तसेच ह्या जगामध्ये प्रसारीत करीत आहोत .

आपल्या संस्थेच्या किंवा चर्चचे बंधने न ठेवता , ह्या सर्व वचनाचे आपण हे सत्य जाणून हे सत्य स्विकारा . आपल्या आत्म्याला त्याच **याव्हे** आदोनाय व त्याचा पूत्र **येशूवाह मशीहा** कडून सार्वकालिक जीवन प्राप्त करून घेऊ . ह्या एकाच विषयाची विभागणी तीन भागामध्ये करून , आपणा समोर हे ठेविलेले आहेत . संदेश व्हिडिओ , व अभ्यासक्रम पुस्तीका हे युटुब , फेसबुक , आणि वेबसाईट व्दारे आपणा सर्वाकरिता प्रकाशीत केलेली आहे . हे सर्वस्वी स्विकारणे आपल्या इच्छेवर आहे . आम्ही ह्या वचनाबाबत आपली कोणतीही प्रतिक्रिया किंवा मते मागवित नाही . जर हे सत्य पटले , तर ते स्विकारा . व ते इतर दुस-यांना देखील हे सत्य शिकवा .

पुढील दुस-या विषयामध्ये नवीन करारातील मूळ व सत्य वस्तुस्थिती ह्या बाबत संदेश व्हिडिओ व अभ्यास पुस्तीका ह्या माध्यमातून पहाणार आहोत . हा संदेश व्हिडिओ पहाणारे , व अभ्यास पुस्तीका ह्यामधून अभ्यास करणा-या , सर्वांचे शेवटी **अदोनाई येशूवाह मशीहा**मध्ये आपले आभार मानतो . व त्यासोबत ज्यांनी इतर प्रकारे साहाय्य केले, व आर्थिक साहाय्य केले , त्यांचे देखील आभार मानतो .

**अदोनाई**ची स्तुति असो.... .        आमेन .

............ समाप्त ............